# ओबीसी नॉन क्रिमीलेअर मर्यादा १५ लाख करण्याची शिफारस



**मुंबई :** राज्यातील ओबीसी समुदायासाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ओबीसी नॉन क्रिमीलेअर मर्यादा आठ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीत यावर चर्चा झाली असून यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे. याचसोबत केंद्र शासनाच्या इतर मागास प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट नसलेल्या ४३ जातींचा प्रस्ताव राष्ट्रीय मागासवर्ग आयोगास सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. ओबीसी जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत. ओबीसी उपसमितीच्या बैठकीत ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतींवरदेखील चर्चा करण्यात आली.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३०१
www.ramprahar.com

◆ बुधवार, २० मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत पेण मंडळ अव्वल/२

फ्लेमिंगो तलावांना पाणथळ दर्जा नाकारला/६

रेवदंडा-साळाव खाडी पूल प्रकल्पाला वेग/७

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# संपूर्ण कोकणाला जलवाहतुकीने जोडणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर आणि संपूर्ण कोकण किनारपट्टीचा प्रवास अधिक वेगवान, पर्यावरणपूरक आणि किफायतशीर करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीचे जाळे विणण्यास सुरुवात केली आहे. मुंबई आणि आसपासच्या परिसरात पुढील तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने तब्बल २७ आधुनिक जेट्टी कार्यान्वित करण्यात येणार असून आगामी काळात ही जलवाहतूक सेवा संपूर्ण कोकण किनारपट्टीला जोडेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १९) दिली. मुंबईत आयोजित एका वृत्तपत्राच्या विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

लॉजिस्टिक आणि प्रवासी वाहतुकीसाठी रस्ते किंवा रेल्वेपेक्षा जलमार्ग हा सर्वात स्वस्त आणि वेगवान पर्याय असल्याने सरकार या क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. ते म्हणाले, अनेक वर्षांपासून मुंबईत जलवाहतूक आणि रो-रो सेवेबाबत केवळ चर्चाच सुरू होत्या. माझ्या मागील मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात आम्ही प्रत्यक्ष पावले उचलत भाऊचा धक्का ते मांडवा (अलिबाग) अशी रो-रो सेवा सुरू केली, जी आज प्रचंड यशस्वी ठरली आहे. याच धर्तीवर आता आम्ही संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात एकात्मिक जलवाहतूक व्यवस्था उभारण्याचे काम हाती घेतले आहे.



मुंबई आणि उपनगरांना सागरी मार्गाने जोडण्यासाठी वेगवेगळ्या २७ ठिकाणी अत्याधुनिक जेट्टी आणि पायाभूत सुविधांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील तीन वर्षांत ही कामे विविध टप्प्यांत पूर्ण केली जातील. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील रस्त्यांवरील वाहनांचा ताण आणि प्रदूषण लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबईच्या या जलवाहतूक नेटवर्कचा विस्तार करून पुढे संपूर्ण कोकण किनारपट्टी जलमार्गाने मुंबईशी थेट जोडली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### लॉजिस्टिक खर्च होणार कमी

जलमार्गाच्या आर्थिक फायद्यांवर प्रकाश टाकताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशाच्या किंवा राज्याच्या आर्थिक विकासात लॉजिस्टिक कॉस्ट (वाहतूक खर्च) अत्यंत महत्त्वाची असते. रस्त्यांच्या तुलनेत जलमार्गाने होणारी वाहतूक ही अत्यंत स्वस्त असते. त्यामुळे प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीसाठीही हा जलमार्ग क्रांती घडवून आणेल.



**मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाचा भाग असणाऱ्या 'कसं काय?' या जनजागृती मोहीम व आरोग्यगीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्यासमवेत मंगळवारी मंत्रालयात केले. यावेळी मंत्रिमंडळातील इतर सदस्य तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.**



# युवा नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठ्यात 'मिनी महाराष्ट्र केसरी'चा थरार

## ■ जंगी कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : हरेश साठे**

महाराष्ट्राच्या पारंपरिक कुस्ती संस्कृतीचा थरार, हजारो क्रीडाप्रेमींची उपस्थिती, मातीतल्या लढतींचा जल्लोष आणि भव्य-दिव्य आयोजनाचा दिमाख अशा उत्साहपूर्ण वातावरणात कामोठे येथे "मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी २०२६" ही जंगी कुस्ती स्पर्धा सोमवारी शानदारपणे पार पडली. भाजपचे युवा नेते, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेने अक्षरशः "मिनी महाराष्ट्र केसरी"चा अनुभव उपस्थितांना दिला. नेपाळ, महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि इतर राज्यांतील नामांकित मल्लांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात कुस्तीचा जल्लोष पहायला मिळाला. यामधील मुख्य स्पर्धेतील विजेत्यांना मानाची गदा आणि रोख रक्कम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या कुस्ती सामन्यांचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मावळ मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती लाभली. (पान २ वर..)

## निवडक

### उमर खालिदची जामीन याचिका कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील दंगलीत मोठ्या कटाशी संबंधित यूएपीए प्रकरणात जेएनयूचा माजी विद्यार्थी नेते उमर खालिद याचा अंतरिम जामिनाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला. खालिदने आपल्या आजारी आईच्या शस्त्रक्रियेदरम्यान तिची देखभाल करण्यासाठी तसेच गेल्या महिन्यात निधन झालेल्या आपल्या काकाच्या विधीमध्ये सहभागी होण्यासाठी १५ दिवसांच्या अंतरिम जामिनाची मागणी केली होती, मात्र मागणीत तफावत असल्याने न्यायालयाने ती फेटाळली.

### अशोक खरातच्या अटकेसाठी 'ईडी'ला न्यायालयाची परवानगी

**नाशिक :** धार्मिक विधी आणि पूजेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणारा भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. मनी लॉण्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत न्यायालयाने सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) अशोक खरातला अटक करण्याची रीतसर परवानगी दिली आहे.

# पनवेलमधील कलाकार अभिनय क्षेत्रात चमकतील -लोकनेते रामशेठ ठाकूर



## प्रशिक्षण शिबिराचा शानदार समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे नाव कला, क्रीडा क्षेत्रात गाजत आहे. महापालिकेचा विस्तार नागरिकांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात झेप घेण्याच्या दृष्टीने सुरू आहे. सांस्कृतिक क्षेत्रातही पनवेलचे नाव गाजविण्यासाठी शिबिराच्या माध्यमातून महापालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद प्रयत्न करते आहे. या प्रशिक्षणार्थींचा अभिनय पाहिल्यावर भविष्यात हे मोठे कलाकार होऊन अभिनय क्षेत्रात चमकतील याची चुणूक त्यांच्या सादरीकरणातून दिसल्याचे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

पनवेल महापालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल, खारघर, कळंबोली येथे ११ मे ते १९ मे अभिनय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा मंगळवारी (दि.१९) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात समारोप झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

समारोप समारंभास महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर, बाल रंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, नियामक मंडळ सदस्य प्रा. डॉ. संजय पाटील-देवळाणकर, भाजप उत्तर रायगड जिल्ह्याध्यक्ष अविनाश कोळी, नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांच्यासह तिन्ही ठिकाणांचे प्रशिक्षणार्थी, त्यांचे पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. .

यावेळी मार्गदर्शन करताना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर म्हणाले की, आजचे युग स्पर्धेचे आहे. त्यामुळे संधी कमी आणि स्पर्धक जास्त असतात. (पान २ वर..)

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयचे छापे

**नागपूर : प्रतिनिधी**

'नीट' पेपरफुटी प्रकरणात मंगळवारी (दि.१९) केंद्रीय गुन्हे अन्वेषण निभागाच्या पथकाने तीन विद्यार्थ्यांच्या घरी झाडाझडती घेतली. यात नागपुरातील दोन विद्यार्थिनींसह चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे.

नवी दिल्ली येथील आर्थिक गुन्हे शाखेने 'नीट'च्या जीवशास्त्र आणि रसायनशास्त्राचे पेपर फुटल्या प्रकरणात सीबीआयच्या गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सीबीआयने आधीच लातूरमधील आरसीसी क्लासेस या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला सोमवारी ताब्यात घेतले आहे.

दरम्यान, सीबीआयच्याला पथकाला नागपुरातील काही विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकाची माहिती मिळाली होती. त्या आधारे नवी दिल्लीतील पथकाने नागपुरातील पथकाच्या सहकार्याने नागपुरात शोधमोहीम राबवली. यात नागपूर येथील दोन विद्यार्थिनींसह चंद्रपूर जिल्ह्याच्या ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या घरी पथकाने झाडाझडती घेत कागदपत्रे आणि काही नोट्स ताब्यात घेतल्या. त्या नोट्स व फुटलेल्या पेपरमध्ये काही साधर्म्य आहे का हे सीबीआयीची टीम पडताळून पहात आहे.

नीट पेपरफूट घोटाळ्यात किमान एक हजार विद्यार्थ्यांनी हा पेपर खरेदी केल्याचा दाट संशय सीबीआयला आहे. त्यापैकी तीन विद्यार्थ्यांनी खरेदी केलेले पेपर हेच होते का, त्यांनी ते इतरांना पाठवले होते का याचीही सीबीआयची टीम चौकशी करत आहे.

# पनवेलमध्ये दुचाकीचालकांना मोफत हेल्मेट वाटप

## ■ युवा नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे युवा नेते, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमध्ये एक स्तुत्य आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला. येथील महापौर आणि जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील यांच्या सौजन्याने सोमवारी दुचाकीचालकांना हेल्मेटचे मोफत वाटप करण्यात आले.

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या या उपक्रमाला वाहनचालकांचा आणि स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हेल्मेटचे वाटप करण्यात आले. जनतेच्या सुरक्षिततेशी निगडित असलेला हा उपक्रम राबवून आयोजकांनी समाजात एक नवा आदर्श घालून दिला आहे.

या कार्यक्रमास नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, सुनील बहिरा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, गजानन घाडगे, माजी नगरसेविका नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, उमेश इनामदार, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे आदी उपस्थित होते.

# शिक्षण संस्थेला जमिनीसाठी मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

अ‍ॅमिटी विद्यापीठाची मूळ संस्था असलेल्या रितनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशन या शैक्षणिक संस्थेला भाताण (ता. पनवेल, जि. रायगड) येथील पंधरा एकर जमीन देण्यास मंगळवारी (दि.१९) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात मान्यता देण्यात आली.

रितनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशनच्या अ‍ॅमिटी विद्यापीठांतर्गत १८ शाखांमधून विविध शैक्षणिक अभ्यासक्रम शिकवले जातात. या ठिकाणी पाच हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून इतर अभ्यासक्रम आणि शैक्षणिक विस्तारासाठी संस्थेने जमिनीची मागणी केली आहे. त्यानुसार भाताण येथील सुमारे १५ एकर जमीन विशेष बाब म्हणून देण्यास मंजुरी देण्यात आली. ही जमीन कब्जेहक्काची रक्कम भरून घेऊन वर्ग-२ या धारणाधिकाराने उपलब्ध करून दिली जाणार आहे. या जमिनीचा वापर शैक्षणिक संकुल तसेच खेळाची मैदाने, वसतीगृहे, ग्रंथालय, प्रयोगशाळा अशा शैक्षणिक कारणासाठी केला जाणार आहे.

# टीम इंडियात युवा खेळाडूंना संधी



**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

देशात आयपीएलचा थरार अंतिम टप्प्यात आला असताना दुसरीकडे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेवर कसोटी आणि तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी संघाची घोषणा केली आहे. दोन्ही संघात काही नव्या खेळाडूंना संधी मिळाली आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेसाठीच्या शुबमन गिल वनडेसह कसोटी संघाचा कर्णधार असून केएल राहुलला कसोटी संघाची, तर श्रेयस अय्यरकडे वनडे संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

संघात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचाही समावेश असून अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला पुन्हा वगळण्यात आले. याशिवाय भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याला अफगाणिस्तानविरुद्धच्या संपूर्ण मालिकेत विश्रांती देण्यात आली आहे. इंग्लंड दौऱ्यापूर्वी त्याचा वर्कलोड व्यवस्थापित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दोन्ही संघात काही नव्या खेळाडूंना संधी मिळाली आहे. यात मानव सुथार, हर्ष दुबे, गुरनूर ब्रार आणि प्रिन्स यादव या खेळाडूंचा समावेश आहे.

दरम्यान, निवड समितीकडून अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांचा दोन्ही संघांमध्ये समावेश करण्यात आला नाही, तर यशस्वी जैस्वालला एकदिवसीय संघातून वगळण्यात आले आहे.

# देशाला ऊर्जा संपन्न बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार -मुख्यमंत्री

## ◆ राज्य शासनाचा अणुऊर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला ऊर्जा संपन्न राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्या वतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.



मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए.पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.

कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांमध्ये करारांचे आदान–प्रदान करण्यात आले.

**करारामुळे होणारी अणुऊर्जा व रोजगार निर्मिती**

अदानी पॉवर लि. कंपनी राज्यात एक लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून सहा हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल तसेच प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्या वर रोजगार उपलब्ध होणार आहे तसेच एनटीपीसी लि. एक लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये पाच हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लि. (बजाज उद्योग समूह) राज्यात दोन लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि तीन हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशा प्रकारे राज्यात एकूण सहा लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि एक लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

# ई-चलनसंदर्भातील मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊ -परिवहनमंत्री सरनाईक

**मुंबई : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेऊन ई–चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई–चलनांची सरसकट रद्दबातल, मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमेऱ्यांच्या कार्यपद्धतीत

## वाहतूकदारांना न्याय देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणार

सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ई–चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल.

तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

# उल्हास नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ परिसरातील उल्हास नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या १७ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. प्रचित दत्तात्रय देशमुख (वय १७, रा. सवणे, ता. पनवेल) असे मृत तरुणाचे नाव आहे. प्रचित नुकताच बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. सुट्टीत तो नेरळ येथे मावशीकडे आला होता. मावशीच्या देखतच प्रचितचा करूण अंत झाला.


मिळालेल्या माहितीनुसार प्रचित हा नेरळ येथील त्याची मावशी, काका तसेच शेजारील कुटुंबियांसोबत बिरदोले परिसरातून बारमाही वाहणाऱ्या उल्हास नदीवर गेला होता. नदीकाठी कपडे धुत असताना प्रचित पोहण्यासाठी नदीत उतरला, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला. यावेळी मावशी व शेजारील व्यक्तीने प्रचितला वाचवण्यासाठी नदीत उडी घेतली, मात्र काही सेकंदांतच प्रचित पाण्यात दिसेनासा झाला. सुमारे दीड तासाच्या प्रयत्नानंतर प्रचितला नदीबाहेर काढून आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले.

शवविच्छेदनानंतर प्रचितचा मृतदेह त्याच्या कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला, तर नेरळ पोलीस ठाण्यात या घटनेची आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महावितरणचे पेण मंडळ अव्वल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार महावितरणने भांडुप आणि कल्याण परिमंडलात एकूण १३ हजार ४४८ लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. यामध्ये महाराष्ट्राने देशभरात १ लाख ८ हजार ३२७ स्थापित सौर प्रकल्पांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे.



भांडुप परिमंडळात पेण मंडळाने सर्वाधिक ६ हजार १५१ प्रकल्पांसह अव्वल स्थान गाठले असून, त्याखालोखाल वाशी मंडळात २ हजार १३२ आणि ठाणे मंडळात ४३९ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. कल्याण परिमंडळात ४ हजार ७२६ प्रकल्पांपैकी वसई मंडळात १ हजार ८८०, पालघर मंडळात १ हजार ३६४, कल्याण–२ मंडळात ८७६ आणि कल्याण–१ मंडळात ६०६ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

पीएम सूर्यघर योजने अंतर्गत घरगुती ग्राहकांना छतावर सौर प्रकल्प बसवण्यासाठी केंद्र सरकारकडून थेट अनुदान दिले जाते. यामध्ये १ किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि ३ किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान थेट दिले जाते.१ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. एकदा हा सौर प्रकल्प बसवला की पुढील २५ वर्षे वीजनिर्मिती होते. घरगुती गरजेपेक्षा जास्त झालेली वीज महावितरणला विकून ग्राहकांना अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याची संधीही या योजनेमुळे उपलब्ध झाली आहे.केंद्रसरकारच्या अनुदानासोबतच राज्य सरकारने राज्यातील दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) आणि महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असलेल्या ५ लाख गरीब ग्राहकांसाठी स्मार्ट योजना सुरू केली आहे. या योजनेत प्रति किलोवॅट खर्च ४५ हजार ४९५ रुपये निश्चित केला असून, केंद्र व राज्याच्या एकत्रित अनुदानामुळे ग्राहकांना अतिशय नाममात्र रक्कम भरावी लागणार आहे.यामध्ये दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) ग्राहकांना तब्बल ९५ टक्के सूट मिळणार असून त्यांना केवळ २ हजार ५०० रुपये भरावे लागतील. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनुसूचित जाती व जमातीच्या ग्राहकांना ९० टक्के सूट मिळून फक्त ५ हजार रुपये आणि सामान्य प्रवर्गातील गरीब ग्राहकांना केवळ १० हजार रुपये भरावे लागणार आहेत.

# खोपोलीत मान्सूनपूर्व नालेसफाई कामे अंतिम टप्प्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

दरवर्षाप्रमाणे याही वर्षी खोपोली नगरपालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. वर्तमान स्थितीत ही कामे अंतिम टप्प्यात सुरू आहेत . प्रभागनिहाय सर्व कामे जून १० पर्यंत पूर्ण होतील असे नगरपालिका कडून सांगण्यात येत आहे .

यासाठी कंत्राटी कामगारांची विशेष टीम नियुक्त करण्यात आली असून ,दोन सुपरवायझर,एक आरोग्य निरिक्षक व गरजेनुसार जेसीबी,मलनिःसारण गाडी याकामी वापरण्यात येत आहे . मात्र शहरातील तिन्ही मुख्य नाल्यांत झालेले अतिक्रमण व करण्यात आलेला अतिरिक्त मातीभराव नालेसफाई मोहिमेत सर्वात मोठी समस्या बनली असून, पावसाळ्यात शहरात पूरस्थितीला आमंत्रण देत आहेत.

खोपोली नगरपालिका प्रशासनाकडून पावसाळ्यापूर्वी कोणतीही गटार व नाला सफाईपासून राहणार नाही असे नियोजन करण्यात आले आहे .सुरुवातील रहिवाशी भागातील भूमिगत व उघड्या गटारी ,नंतर नौसार्गिक नाले अश्या पद्धतीने ही नालेसफाई १० जून पूर्वी पूर्ण होणार आहे. शहरात मोगालावाडी ते हायको कॉर्नर या भागातील सर्व रहिवाशी भागांना जोडणारा मोठा नैसर्गिक नाला आहे . पावसाळ्यात सह्याद्री डोंगर रांगातून वाहणारे पाणी याच नाल्याच्या मार्गाने पुढे पाताळगंगा नदीला जाते. मात्र मागील काही वर्षांत नाल्याला लागून असलेल्या रहिवाशांनी व विकसकांनी अतिरिक्त माती भराव व अतिक्रमनाणे करून या नाल्याची नैसर्गिक रुंदी पन्नास टक्के कमी केली आहे. अशीच स्थिती अन्य दोन्ही मुख्य नैसर्गिक नाल्यांची आहे . मूसळदार पाऊस सुरु झाल्यावर पाण्याचा निचरा होत नसल्याने विणानगर ,कृष्णा नगर , शास्त्रीनगर मधील काही भाग , तसेच खालची खोपोली,शीळफाटा येथील मोठया वस्तीत पाणी भरून दरवर्षी पूरसदृश्य स्थिती निर्माण होते. नाल्यातील सदर झालेले अतिक्रमणे व अतिरिक्त माती भराव नगरपालिकेने काढण्याची गरज आहे . मात्र या बाबत प्रशासन मुग गिळून आहे.

शहरातील शीळफाटा,लौजी , विहारी,चिंचवली, सिध्दार्थनगर या भागातही अंतर्गत नाले सफाई व भूमिगत गटारी स्वच्छता मोहीम सुरू आहे.

पान १ वरुन

## युवा नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठ्यात ‘मिनी महाराष्ट्र केसरी’चा थरार

प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, पनवेलचे महापौर नितीन पाटील, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपमहापौर प्रमिला पाटील, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, पेण नगर परिषदेचे गटनेते अनिरुद्ध पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नगरसेवक रवींद्र जोशी, शशिकांत शेळके, अजय बहिरा, राजेंद्र शर्मा, डॉ. अरुणकुमार भगत, एकनाथ गायकवाड, नगरसेविका शीला भगत, रूचिता लोंढे, अस्मिता घरत, सरस्वती काथारा, प्रतिभा भोईर, कुसुम म्हात्रे, माजी नगरसेवक पापा पटेल, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, अनेश ढवळे, राजेश गायकर, योगेश लहाने, नवीन पनवेल युवा मोर्चा अध्यक्ष मयूर कदम, सुशील शर्मा, हर्षवर्धन पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, कुस्तीगीर संघटनेचे बळीराम पाटील, आयोजक नगरसेवक हॅप्पी सिंग, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रसिद्ध कुस्तीपटू आणि प्रशिक्षक रूपेश पावशे, कामोठे महिला मोर्चाच्या अध्यक्ष वनिता पाटील, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह राज्यातील ज्येष्ठ पैलवान, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी युवानेते परेश ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हजारो मान्यवरांनी आणि नागरिकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी बोलताना आमदार नितेश राणे म्हणाले की, माझा आणि कुस्तीचा थेट संबंध दिसेल असे वाटत नाही, कारण आमचा आखाडा वेगळा आहे. आमचा आखाडा हिंदुत्वाचा असून आम्ही रोज ‘हिरवे साप’ ठेचतो. त्यामुळे या आखाड्यात आणि आमच्या आखाड्यात फरक आहे. पुढे बोलताना त्यांनी म्हटले, साधारणपणे एवढी भव्य कुस्ती स्पर्धा फक्त पश्चिम महाराष्ट्रातच पहायला मिळते असा एक समज आहे, मात्र आज कामोठ्यात झालेली ही गर्दी आणि आयोजन पाहिल्यानंतर आम्हीही पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कुठेही कमी नाही, असाच स्पष्ट संदेश परेश ठाकूर यांच्या माध्यमातून गेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र येणे हे परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाची वाढती ताकद दाखवणारे असून त्यांचे भविष्य उज्वल असल्याचे सांगून ना. राणे यांनी वाढदिवसाच्या आणि भावी वाटचालीच्या मनापासून शुभेच्छा दिल्या. या भव्य परेश ठाकूर केसरी कुस्ती स्पर्धेने संपूर्ण पनवेल आणि रायगड जिल्ह्यात एक नवा इतिहास रचला असून या अभूतपूर्व क्रीडा सोहळ्याची चर्चा आता महाराष्ट्रभर रंगली आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

लोकांमध्ये राहून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर हे दोन्ही सुपुत्र करत आले आहेत. ते शांत पण धाडसी व्यक्तिमत्व असून लोकांना आधार आणि मदत देण्याचे काम करत असतात. कुस्ती आणि माझे जवळचे नाते आहे. ही स्पर्धा अत्यंत सुरेख असा अनुभवायला मिळाला, अशा शब्दात खासदार श्रीरंग बारणे यांनी शुभेच्छा दिल्या, तर आमदार निरंजन डावखरे यांनी कोकणच्या भूमीत पण कुस्तीवर प्रेम करणारी लोकं आहेत हे या कुस्ती सामन्यातून स्पष्ट होत असल्याचे मत व्यक्त केले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंनी सहभाग घेतल्याने प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा आणि रोमांचकारी ठरला. मुख्य कुस्तीमध्ये रुस्तम–ए–हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल पै. लाली चमकोर, उपमहाराष्ट्र केसरी पै. किरण भगत विरुद्ध पै. बागा सिंघ, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध हिंद केसरी पै. संदीप कुमार तसेच महाराष्ट्र केसरी पै. दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. माउली कोकाटे यांच्या लढतींनी प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहचवला. महिला गटातील सामनेही आकर्षणाचे केंद्र ठरले. पै. अमेघा घरत विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती पै. एकता शर्मा, पै. पलक यादव विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. वेदांतिका पवार तसेच नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल पै. रुबी थापा विरुद्ध उत्तराखंडची पै. कोमल यांच्या लढतींना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

या स्पर्धेत जवळपास ७५ सामने खेळविण्यात आले. विजेत्या मल्लांसाठी तब्बल १५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली होती. विशेष म्हणजे स्थानिक आणि ग्रामीण भागातील नवोदित मल्लांनाही या व्यासपीठावर संधी देण्यात आल्याने अनेक तरुण खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळाली. स्पर्धेसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भव्य मैदान, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, वैद्यकीय सुविधा, हलगीचा ताल, मर्दानी आवाजात सूत्रसंचालन, सुरक्षेची काटेकोर व्यवस्था आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे स्पर्धेचे आयोजन सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरले.

युवा नेते परेश ठाकूर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. युवकांना प्रोत्साहन मिळावे, ग्रामीण भागातील प्रतिभेला व्यासपीठ मिळावे आणि महाराष्ट्राची पारंपरिक कुस्ती संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहचावी, या उद्देशाने ते सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही “मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी” स्पर्धेने क्रीडाप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवले.

***अशा रंगल्या मुख्य लढती***

*✻ रुस्तम–ए–हिंद सिकंदर शेख विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल लाली चमकोर = सिकंदर शेख विजयी*

*✻ उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत विरुद्ध पै. बागा सिंघ = किरण भगत विजयी*

*✻ ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी विरुद्ध हिंद केसरी संदीप कुमार = विजय चौधरी विजयी*

*✻ महाराष्ट्र केसरी दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी माउली कोकाटे = कुस्ती बरोबरीत सुटली*

*✻ अमेघा घरत विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती एकता शर्मा = एकता शर्मा विजयी*

*✻ पलक यादव विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी वेदांतिका पवार = वेदांतिका पवार विजयी*

*✻ नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल रुबी थापा विरुद्ध उत्तराखंडची कोमल = रुबी थापा विजयी*

## पनवेलमधील कलाकार अभिनय क्षेत्रात चमकतील –लोकनेते रामशेठ ठाकूर

अशा वेळी स्वतःला चांगल्या प्रकारे अभिव्यक्त करणाऱ्याला ती संधी मिळते. ते शिक्षण या अभिनय शिबिराच्या माध्यमातून दिले जाते. व्यक्तिमत्व घडविण्यासाठी ही अभिनय प्रशिक्षणे निश्चित उपयोगी पडणार आहेत. त्यासाठी महापालिकेने अशी शिबिरे नेहमी भरवावी, असेही त्यांनी सांगितले.

बाल रंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्ष नीलम शिर्के–सामंत म्हणाल्या की, प्रत्येकजण आपल्या आपल्या क्षेत्रात अभिनयच करत असतो. प्रत्येकामध्ये कलावंत असतो व प्रत्येकाने तो जिवंत ठेवायचा असतो. अभिनयाला वय नसते. त्यामुळे प्रत्येकाने ही कला जोपासायला हवी. पनवेलला लवकरच बालरंगभूमीची शाखा सुरू करण्याबाबतचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

महापौर नितीन पाटील यांनी आभार मानताना सांगितले की, कोणत्याही शहराची ओळख ही तिथल्या इन्फ्रास्ट्रक्चरमुळे होत नाही, तर त्या शहराची सांस्कृतिक चळवळ कशी आहे, सांस्कृतिक वारसा जपला जातो आहे की नाही यावर ठरत असते. पालिकेच्या या नाट्यगृहामध्ये होणाऱ्या या अभिनय शिबिरांच्या माध्यमातून हा वारसा जोपासला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पनवेल, खारघर, कळंबोली येथील अभिनय प्रशिक्षण शिबिराच्या प्रशिक्षणार्थींनी मान्यवरांच्या उपस्थितीत सादरीकरण केले. या सादरीकरणाला मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाबासकी दिली तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्राचे वाटप करण्यात आले.

याबरोबरच या नाट्यशिबिरासाठी मार्गदर्शन केलेले प्रशिक्षक अशोक केंद्रे, संकेत खेडकर, विद्यानाथ सुर्वे, मनोज चिताडे, विक्रांत धीवरे, अमित गाडे, हरीश जाधव यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक महापालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, स्मिता गांधी, कविता ठाकूर उपस्थित होते. प्रशिणार्थींना मार्गदर्शनासाठी नाट्य निर्मितीसंदर्भातील विविध पुस्तकांचे वाटप यावेळी करण्यात आले.



# उत्तराखंडच्या संस्कृतीचा नवी मुंबईत रंगारंग सोहळा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली उपस्थिती



**कळंबोली : बातमीदार**

नवी मुंबईसह पनवेलमध्ये वास्तव्य करणाऱ्या उत्तराखंड वासियांनी गेल्या सतरा वर्षापासून कौथिंग नावाने भरवल्या जाणाऱ्या कला आणि संस्कृतीच्या उत्सवाने उत्तराखंड समाजमन आणि संस्कृती साकारली गेली. कला संस्कृती तसेच खाद्य संस्कृतीच्या देवाण-घेवाणीने आगळ्या वेगळ्या पद्धतीने उत्तराखंडचे संस्कृतीचे प्रदर्शन या निमित्ताने नवी मुंबईकरांना घडले. उत्तराखंडच्या बहारदार कला खाद्य पारंपारिक नृत्य व अन्य संस्कृतीच्या प्रदर्शनाने पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर ही भारावून गेले. सानपाडा येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई मैदानामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल तसेच नवी मुंबईमध्ये लाखोंच्या संख्येने उत्तराखंडवासीय आपल्या व्यवसायात नोकरी धंद्यानिमित्त वास्तव्य करून आहेत. गेल्या सोळा वर्षापासून नवी मुंबईमध्ये कौथिंग नावाने येथे पारंपरिक पद्धतीचे एक प्रकारे उत्तराखंडवासियांचे स्नेहसंमेलन भरवले जाते. यामध्ये उत्तराखंड मधील विविध पारंपरिक संस्कृतीचे प्रदर्शन या दहा दिवसाच्या बहारदार कार्यक्रमात नवी मुंबईकरांना दाखवले जाते. जरी उत्तराखंड वासियांचा कार्यक्रम असला तरी महाराष्ट्राची पारंपारिक नृत्य ,पोवाडे ,आगरी कोळी नृत्य, अभंग, किर्तन यांचाही समावेश या उत्तराखंड वासीय संस्कृतीमध्ये केला गेला .त्यामुळे या कार्यक्रमाला एक आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झाले.

आम्ही उत्तराखंडवासीय असलो तरी महाराष्ट्रीय संस्कृती बरोबर आमचा घरोबा झाला असल्याने आम्ही समरस होऊन महाराष्ट्राच्या मातीमध्ये एकरूप झालो असल्याची भावना यावेळी दिलीप भिस्त यांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमाला उत्तराखंडातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून या कार्यक्रमांमध्ये अधिक जान आणली. या सांस्कृतिक कार्यक्रमाला पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उत्तराखंडवासी यांनी दाखवलेल्या विविध संस्कृती कला कार्यक्रमाचे मनापासून स्वागत केले. या पुढील दरवर्षी होणाऱ्या या उत्तराखंड बंधू भगिनींच्या कार्यक्रमाला मी आवर्जून उपस्थित राहणार असल्याचे निर्धार यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

या प्रसंगी कॉथिग मुंबईचे संयोजक मा. केसर सिंग बिष्ट जी, नवी मुंबई महानगरपालिकेचे आरोग्य सभापती मा. डॉ. जयाजी नाथ तसेच कळंबोली शहराचे सरचिटणीस दिलीप बिष्ट उपस्थित होते.



**पनवेल : शिष्यवृत्ती परीक्षेतील अंतरिम यादीत पात्र ठरलेल्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेज गव्हाणमधील सात विद्यार्थ्यांनी प्राचार्य, मार्गदर्शक शिक्षक व पालकांसह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी अरुणशेठ भगत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## पनवेलजवळील बारवई येथे कंटेनरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील बारवाई पुलाजवळ एका कंटेनर चालकाने वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत, कोणताही पूर्वइशारा किंवा पार्किंग सिग्नल न देता आपला कंटेनर धोकादायक वळणावर उभा केल्याने सदर कंटेनरवर धडकून एका दुचाकीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणातील फरार कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव आकारा दादु पवार (२३) असे असून तो खालापूर तालुक्यातील नढाळ येथील रहिवासी आहे. आकाश आपल्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच ४६ सीजे ०९०५) पनवेल तालुक्यातील बारवई पुलाजवळुन जात असताना येथील डाव्या बाजूच्या वळणावर बंद स्थितीत उभ्या असलेल्या कंटेनरचा त्याला अंदाज आला नाही. त्यामुळे आकाश दुचाकीसह सदर कंटेनरवर धडकला. या अपघातात आकाश गंभीर जखमी झाल्याने त्याचा काही वेळात मृत्यू झाला. या अपघातानंतर कंटेनर चालक इंद्रेशकुमार लालधर (४६) याने जखमी तरुणाला कोणतीही वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न केला नाही, तसेच अपघाताची माहिती पोलिसांना न देता तो घटनास्थळावरून पळून गेलत्याचा शोध सुरू आहे.

## निवडक

### हनुमान मंदिरात चोरी

**पनवेल :** पनवेलजवळील आर-२ या ठिकाणी असलेल्या हनुमान मंदिरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून दान पेटीतील रोख रक्कम तसेच एक समई चोरुन नेल्याची घटना घडली आहे. पनवेलजवळील चिंचपाडा तलावाजवळ सेक्टर आर-२ येथे हनुमान मंदिर असून या ठिकाणी अज्ञात चोरट्याने प्रवेश करून मंदिरातील दानपेटी फोडून तेथे जमा असलेली रोख रक्कम त्याचप्रमाणे समई चोरुन नेली आहे. याबाबतची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आली आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेलजवळील सेक्टर आर-२ वडघर-चिंचपाडा येथून एक मोटरसायकल चोरी झाल्याची घटना घडली आहे.शशिकांत भोईर यांनी त्यांच्या ताब्यातील काळ्या रंगाची पॅशन प्लस मोटरसायकल क्र.एमएच-०६-जे-९५०५ ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वळवली बसस्टॉपजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वळवली गाव बस स्टॉप येथे एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत.सदर इसमाचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, उंची ५ फुट, डोक्याचे केस काळे, पुढील बाजूस टक्कल पडलेले, दाढी काळी-पांढरी बारीक फ्रेंच कट असलेली, मिशा काळ्या पांढऱ्या वाढलेल्या, इसमाचा रंग सावळा आहे. त्याच्या गळ्यामध्ये काळ्या पांढऱ्या रंगाच्या मण्यांच्या दोन माळा आहेत. तसेच तो अंगाने मध्यम आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा सपोनि राजरत्न खैरनार यांच्याशी संपर्क साधवा.

### लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास

**पनवेल :** तळोजा नावडे फेस टू येथे केलेल्या घरफोडीत चोरांनी दोन लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी प्रदीप सोनवणे यांच्या बंद घराच्या दरवाज्याचे लॉक तोडून चोरांनी आत प्रवेश केला आणि मंगळसूत्र, सोन्याचा नेकलेस, अंगठ्या, ब्रेसलेट, झुमके आणि रोख रक्कम चोरून नेली.

### दोन लाखांच्या मालाची चोरी

**पनवेल :** खारघर येथील गाळ्याचे शटर उचकटून चोरांनी दोन लाख रुपयांच्या मालाची चोरी केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनीत कुमार तिवारी हे घोटगाव, तळोजा येथे राहत असून ते प्लॅटिनम ग्रुप येथील साइटवर काम करतात. सेक्टर ३० खारघर येथील साइटवरील गाळ्याचे शटर उचकटून तांब्याचे दोन वायर, ॲल्युमिनियम पाईप, पितळेचे नग, तांब्याचे पाईप चोरांनी चोरून नेले. त्याचा तपास सुरू आहे




**पनवेल : येथील महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांचा वाढदिवस सोमवारी विविध उपक्रमांनी साजरा झाला. त्यांना वाढदिवसानिमित्त दै.वादळवाराचे संपादक विजय कडू, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, विशाल सावंत आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## वृत्तपत्रांसाठी लागणाऱ्या कागदांच्या रोलचे कंटेनर जेएनपीए बंदरात अडकले




**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदरात परदेशातुन राज्यातील वृत्तपत्रांसाठी लागणाऱ्या कागदांचे रोल आयात करण्यात आलेले सुमारे ४ ते ५ हजाराहून अधिक कंटेनर अडकून पडले आहेत. मागील १५ दिवसांपासून अडकून पडलेल्या या कंटेनरमुळे मात्र राज्यातील वृत्तपत्र व छपाई व्यवसाय अडचणीत आला आहे. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती आता कमी अधिक प्रमाणात नियंत्रणात आली आहे. यामुळे महाराष्ट्रातील विविध छपाई कंपन्यांच्या माध्यमातून परदेशातुन वृत्तपत्र छपाईसाठी रशिया, कॅनडा, सिंगापूर, मलेशिया, आफ्रिका, युरोपातुन कागद आयात करण्यात आलेला

### व्यवसाय अडचणीत

आहे, मात्र कोट्यवधींचा छपाईचा कागद जेएनपीए बंदरात मागील १५ दिवसांपासून अडकून पडलेला आहे.जेएनपीए अंतर्गत बंदरातील कंटेनर वाहतूक करणारी यंत्रणा कंटेनर ट्रेलर वाहनचालकांच्या कमतरतेमुळे धिम्या गतीने चालविली आहे. त्यामुळे अवघ्या तीन दिवसात खाली होणाऱ्या कंटेनर जहाजाला सुमारे १५ दिवसांचा प्रदीर्घ कालावधी लागत असल्याने तेवढ्या दिवसांचा कंटेनर बंदर साठवणूक चार्ज लावला जात असल्याने खर्च अधिक प्रमाणात वाढत आहे. अशा बाबींमुळे यंत्रणा कोलमडल्यानेच ही वेळ येऊन ठेपली आहे.यामुळे राज्यातील वृत्तपत्र छपाई करणाऱ्या कंपन्या अडचणीत सापडलेल्या आहेत. जेएनपीए बंदरात परदेशातुन विविध कंपन्यांच्या माध्यमातून वृत्तपत्र छपाईसाठी आयात करण्यात आलेले सुमारे चार हजार कंटेनर मागील १५ दिवसांपासून अडकून पडले आहेत. यामुळे वृत्तपत्र व छपाई व्यवसाय अडचणीत सापडला आहे, असे आयातदार टायटॅनिक ओशिएन सर्व्हिसेस कंपनीचे ऑपरेशन मॅनेजर कैलास आवटे यांनी सांगितले.

## लाचखोर मंडळ अधिकारी जाळ्यात



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल गावदेवीपाडा येथील ४.२२ गुंठे जमिनीची सातबाऱ्यावर नावाची नोंद मंजूर करण्याकरिता पनवेल तहसील कार्यालयात कार्यरत असणारे मंडळ अधिकारी गोवर्धन माने यांनी फिर्यादीकडे ५० हजाराची लाच मागितली होती. त्यातील ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अलिबाग रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी (दि.१९) सायंकाळी रंगेहाथ पकडले.

फिर्यादी यांच्याकडे पनवेल तहसील कार्यालयात कार्यरत असणारे मंडळ अधिकारी गोवर्धन माने यांनी त्यांचे काम करण्याकरिता स्वतःकरिता २० हजार रुपये तसेच थंब अॅप्रुव्ह करून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी १० हजार रुपये असे एकूण ३० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. सदर रक्कम पंचमुखी हनुमान मंदिराशेजारी मिठास स्वीटस्‌समोर स्वीकारत असताना विशेष पथकाने सापळा रचून गोवर्धन माने यांना ताब्यात घेतले.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावे येथे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, चंद्रकांत भोईर आणि ग्रामस्थांनी अभीष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या.**

## अमरधाम स्मशानभूमीत आता बसणार २००० लिटरची टाकी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने नातेवाईकांना चक्क बिसलेरीच्या पाण्याच्या बाटल्या विकत आणून अंतिम विधी करावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या ढिसाळ कारभारामुळे मृतकांच्या नातेवाईकांसह स्थानिक नागरिकानीतीव्र संताप व्यक्त केला होता

मिळालेल्या माहितीनुसार, स्मशानभूमीत एकाच वेळी दोन मृतदेह अंत्यसंस्कारासाठी आले होते, मात्र तिथे पाणीच नव्हते. नातेवाईकांनी तात्काळ पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाशी आणि टँकरसाठी संपर्क साधला, पण वेळेत टँकरही उपलब्ध होऊ शकला नाही. अखेर नाईलाजास्तव नातेवाईकांनी बाहेरून बिसलेरीच्या पाण्याच्या बाटल्या आणून विधी पूर्ण केला.

यावर स्पष्टीकरण देताना ठेकेदाराच्या कर्मचाऱ्याने आधी पाच मृतदेह आल्यामुळे ५०० लिटर पाणी संपले, असे कारण पुढे केले होते. मात्र, कर्मचाऱ्याने दिलेले हे कारण चुकीचे असल्याचे सांगत पालिकेने ते फेटाळून लावले आहे.



स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी पाण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेबाबत ठेकेदाराने आणि त्याच्या कर्मचाऱ्यांनी आधीच जागृत राहायला हवे होते, असे सांगत पालिकेने संबंधित ठेकेदाराला कडक सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून येथील ५०० लिटरची जुनी टाकी हटवून आता २००० लिटर क्षमतेची नवीन टाकी बसवण्याचा निर्णय घेतला आहे. ही २००० लिटरची टाकी भविष्यात पुरेशी राहील आणि नागरिकांची गैरसोय टळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## पनवेलमध्ये ४०० खाटांचे ‘हिरकणी’ रुग्णालय आकारास

### प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वमालकीचे पहिले बहुविशेषज्ञ रुग्णालय ठरणाऱ्या ‘हिरकणी माता बालसंगोपन’ रुग्णालयाच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. सुमारे १५३ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात येणारे हे ४०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय जून २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, पनवेलकरांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

नवीन पनवेलमधील सेक्टर १८ येथील (नौपाडा गावासमोर कळंबोली सर्कल ते जेएनपीए महामार्गालगत) प्लॉट क्रमांक ८-अ आणि ८-ब या भूखंडावर दहा मजली रुग्णालय उभारले जात आहे. ४ डिसेंबर २०२५ रोजी मे. आर. आर. तुळशी बिल्डर्स प्रा. लि. या कंपनीला कार्यादेश देण्यात आला होता. पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने प्रत्यक्ष काम १८ एप्रिलनंतर सुरू झाले. सध्या भूखंडावर खोदकामाचे काम सुरू आहे. सुमारे साडेसात हजार चौरस मीटर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या रुग्णालयात १०० आयसीयू खाटा, ४५ एनआयसीयू खाटा, एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स-रे, मेमोग्राफी, सोनोग्राफी तसेच प्रसूतीसाठी स्वतंत्र शस्त्रक्रिया कक्ष अशी आधुनिक सुविधा उपलब्ध असणार आहे. याशिवाय १३६ चारचाकी आणि ४५१ दुचाकींसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या दहा लाखांच्या पुढे गेल्याचा अंदाज असताना महापालिकेचे स्वतःचे रुग्णालय नसल्याची उणीव या प्रकल्पामुळे भरून निघणार आहे.

## ‘पनवेल स्टेशनवरील प्लॅटफॉर्म फक्त ९० मीटर पुढे; प्रवाशांना केवळ दोन-तीन मिनिटे अतिरिक्त चाल’

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानकावरील प्लॅटफॉर्म खूप लांब गेल्याच्या आणि प्रवाशांना प्रचंड पायपीट करावी लागत असल्याच्या सोशल मीडियावरील दाव्यांचे मध्य रेल्वेने खंडन केले आहे. मध्य रेल्वेने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, पनवेल उपनगरीय टर्मिनस येथील विद्यमान हार्बर लाईन प्लॅटफॉर्मचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) च्या दिशेकडील भाग केवळ ९० मीटरने म्हणजेच सुमारे तीन डबे मावतील एवढ्याच अंतराने पुढे सरकवण्यात आला आहे. हा बदल सोमवार, ११ मे २०२६ पासून लागू करण्यात आला आहे.



सध्या सोशल मीडियावर हा प्लॅटफॉर्म तब्बल एक किलोमीटरने वाढवण्यात आल्याच्या चुकीच्या अफवा पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभाग अभियंता (SSE) श्रीकुमार यांनी स्पष्ट केले की, प्लॅटफॉर्मचा विस्तार केवळ ९० मीटरचाच असून, यामुळे प्रवाशांना फक्त २ ते ३ मिनिटे अतिरिक्त चालावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांनी सोशल मीडियावरील कोणत्याही अतिशयोक्तीपूर्ण दाव्यांवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या निर्माणाधीन असलेल्या महत्त्वाकांक्षी पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे मार्गिकेचे काम विद्यमान हार्बर लाईनशी जोडण्यासाठी हे विस्तारीकरण तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आवश्यक आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे अंतिम बांधकाम पूर्ण होण्यासाठी आणखी ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. हा नवीन उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर पूर्ण झाल्यावर लाखो प्रवाशांचा भविष्यातील प्रवास अधिक सुकर आणि वेगवान होणार आहे.

हा प्रकल्प प्रवाशांच्याच हिताचा असल्याने, पुढील ६ महिने बांधकाम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, स्थानकावर येताना वेळेचे थोडे नियोजन करावे आणि संयम बाळगावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## संपादकीय

# यश विकणारी दुकाने!

ग्रामीण भागातील, मध्यमवर्गीय किंवा गरीब कुटुंबातील विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करून परीक्षा देतात; पण जर पैसा आणि संपर्क यांच्या आधारे निकाल ठरत असतील, तर मेहनतीचे मूल्य काय उरते? हीच भावना तरुण पिढीत व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण करते.

**देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठीची सर्वात महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा आज केवळ स्पर्धा राहिलेली नाही; ती आता व्यवस्थेच्या विश्वासार्हतेची परीक्षा बनली आहे. दररोज समोर येणाऱ्या नव्या प्रकरणांमुळे पेपरफुटी हा एखाद्या छोट्या टोळीचा उद्योग नसून, त्यामागे खोलवर रुजलेली, बहुराज्यीय आणि पैशांच्या अमाप लालसेवर उभी असलेली साखळी कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे. या साखळीचे धागेदोरे बिहार, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेशपासून महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्याच्या चर्चा आहेत. महाराष्ट्रात काही ठिकाणी पेपरफुटीच्या कटाची आखणी झाली, आर्थिक व्यवहार झाले आणि उमेदवारांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचविण्याची यंत्रणा सक्रिय होती, असे तपासातून सूचित केले जात आहे. याबाबतचे अंतिम सत्य न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल; परंतु शिक्षणव्यवस्थेच्या पाया हादरून जावा एवढी संशयाची सावली आता गडद झाली आहे यात शंका नाही. केवळ एका परीक्षेचा पेपर फुटला, एवढ्यापुरतीच ही घटना मर्यादित नाही. आपल्या शिक्षणव्यवस्थेतील व्यापारीकरण, कोचिंग संस्कृती, राजकीय संरक्षण, भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणा आणि पालकांच्या असुरक्षित मानसिकता या सर्वांचा एकत्रित परिणाम या एका घटनेभोवती गुंफलेला दिसतो. मुळात, वैद्यकीय शिक्षण हे प्रतिष्ठा, पैसा आणि सामाजिक दर्जा यांचे प्रतीक बनले आहे. कदाचित या मोहातूनच लाखो विद्यार्थी रात्रंदिवस परिश्रम करत असताना काही जण पैशाच्या जोरावर शॉर्टकट शोधू लागतात. याच मानसिकतेतून 'रॅकेट' जन्माला येते. प्रश्नपत्रिका मिळवून देणे, डमी उमेदवार बसवणे, डिजिटल उपकरणांतून उत्तरे पोहोचवणे, परीक्षाकेंद्रांतील कर्मचाऱ्यांना हाताशी धरणे, कोचिंग संस्थांच्या माध्यमातून संपर्क वाढवणे अशा अनेक गैरप्रकारांची ही संपूर्ण साखळी आता संघटित गुन्हेगारीच्या स्वरूपात उभी राहिल्याचे चित्र आहे. या सर्व प्रकारातील महाराष्ट्राचा संदर्भ अधिकच गंभीर आहे. महाराष्ट्र हे शिक्षणाचे मोठे केंद्र मानले जाते. पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद यांसारख्या शहरांत शिकवणी वर्गांचा उद्योग अब्जावधी रुपयांचा झाला आहे. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक आणि आर्थिक दबाव असतो. या पार्श्वभूमीवर याच उद्योगातील काही धंदेवाईक घटकांनी 'यश विक्रीसाठी उपलब्ध' असल्याचा बाजार उभा केला. तपास यंत्रणांकडून उघडकीस येणारे प्रकार पाहता, ही संघटित बाब असल्याचे स्पष्ट झाले आहे. असे झाले की प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होते, आणि एकदा विश्वास ढासळला की, गुणवत्तेवर आधारित परीक्षांचा संशयाच्या गर्तेत गुरफटून जातात. या प्रकरणात समोर येणारा 'कोचिंग माफिया' हा प्रकारही गंभीर आहे. शिक्षणव्यवस्थेने भ्रष्टाचाराची दारेच उघडली आहेत, असा याचा थेट अर्थ होतो. या गैरप्रकारांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे, या संघटित प्रकारातील सहभागाची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत. शिक्षणातील अतिरेकी स्पर्धेचा मुद्दाही या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका परीक्षेवर लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून राहणार असेल, तर भ्रष्टाचारास वाव मिळण्याची शक्यता लक्षात घेऊन वैद्यकीय शिक्षणाच्या जागा वाढवणे, गुणवत्तापूर्ण सरकारी महाविद्यालयांची संख्या वाढवणे, आणि विद्यार्थ्यांवरील मानसिक दबाव कमी करणे अशा काही सुधारणांचाही विचार व्हावयास हवा. कारण या गैरप्रकारांनी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राची विश्वासार्हता पणाला लागली आहे, आणि ती जपलीच पाहिजे.**

# प. आशियाई संकटात महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण व धाडसी पाऊल

सर्वं राष्ट्रहितार्थम्..।
सर्व काही राष्ट्रासाठी...!

सध्या संपूर्ण जगाचे लक्ष पश्चिम आशियातील वाढत्या तणावाकडे आणि अस्थिरतेकडे लागले आहे. या जागतिक संकटामुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आर्थिक आणि संसाधनांच्या टंचाईला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने आधीच देशपातळीवर पावले उचलली आहेत. याच पार्श्वभूमीवर मा. पंतप्रधानाच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यापक शासन परिपत्रक जारी केले आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या या परिपत्रकातून प्रशासकीय स्तरावर दूरगामी बदल घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. हा केवळ एक प्रशासकीय आदेश नसून संकटसमयी संसाधनांचे संवर्धन आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारा एक महत्त्वपूर्ण आराखडा आहे. या परिपत्रकातील प्रमुख मुद्दे आणि त्याचे संभाव्य सकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

१. इंधन बचत आणि शाश्वत वाहतुकीला प्राधान्य

पश्चिम आशियातील संकटामुळे सर्वात मोठा फटका इंधन पुरवठ्याला बसू शकतो. हे ओळखून शासनाने वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदलांचे संकेत दिले आहेत.

इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य : बाह्यस्त्रोतांकडून (outsourcing) घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रीक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. तसेच चार्जिंग सेंटर्स उभारण्याच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन वीज दर कमी करण्याबाबत विचार केला जाईल.

पब्लिक ट्रान्सपोर्ट आणि कारपूलिंग : शासकीय अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी आणि एकत्रित दौऱ्यांसाठी 'कारपूलिंग' (Carpooling) व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे आवश्यक केले आहे.

मिरवणुकांवर बंदी : इंधनाचा अपव्यय टाळण्यासाठी पोलीस विभागाने कोणत्याही बाईक रॅली, वाहनांच्या मिरवणुका किंवा मोठ्या ताफ्यांना परवानगी देऊ नये, असे निर्देश आहेत.

२. आर्थिक शिस्त आणि परकीय चलनाचे संवर्धन जागतिक मंदी आणि संकटकाळात राज्याची तिजोरी आणि देशाचे परकीय चलन सुरक्षित ठेवण्यासाठी कडक पावले उचलली गेली आहेत.

परदेश दौरे रद्द : शासकीय अधिकाऱ्यांचे अभ्यास किंवा शासकीय कामासाठीचे मंजूर असलेले सर्व परदेश दौरे रद्द करण्यात आले असून नवीन दौऱ्यांच्या नियोजनावर बंदी घालण्यात आली आहे.सल्लागारांच्या नेमणुकीला ब्रेक : पुढील सहा महिन्यांसाठी कोणत्याही प्रशासकीय विभागात नवीन सल्लागारांची (Consultants) नेमणूक न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यामुळे अनावश्यक आर्थिक भार टळेल.

डिजिटल बैठकांवर भर : मंत्रालय, विभाग आणि जिल्हा पातळीवरील सर्व बैठका, सेमिनार आणि प्रशिक्षणे आता व्हीसी (Video Conferencing) किंवा ऑनलाइन पद्धतीनेच होतील. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करणे बंधनकारक आहे.

३. ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन शासकीय कार्यालयांपासून ते सामान्यांच्या घरांपर्यंत ऊर्जेची बचत करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

कार्यालयांमध्ये ऊर्जा बचत : कार्यालयीन वेळेत नैसर्गिक प्रकाशाचा वापर वाढवणे, काम संपताच दिवे, पंखे, संगणक, एसी आणि लिफ्ट बंद करणे बंधनकारक राहील. तसेच एसीचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअसवर ठेवण्याचे निर्देश आहेत.

सौरऊर्जेला गती : "प्रधानमंत्री सूर्यघर" योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त घरांवर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यावर भर दिला जाईल.

बॅनर आणि होर्डिंग्जवर मर्यादा : शासकीय जाहिराती माफक प्रमाणात करून अनावश्यक खर्च टाळला जाईल. फ्लेक्स, बॅनर आणि डेकोरेटिव्ह लाईट्सचा वापर कमी केला जाईल आणि होर्डिंग्जसाठी डीजी सेट (जनरेटर) वापरण्यास मनाई असेल.

४. अन्न सुरक्षा, पीएनजी आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा संसाधनांच्या योग्य वापरासाठी थेट नागरिकांच्या जीवनशैलीशी जोडलेले निर्णय यात समाविष्ट आहेत.

खाद्यतेलाचा तर्कसंगत वापर : कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, हॉस्टेल्स, तुरुंग आणि रुग्णालयांच्या मेन्यूमध्ये बदल करून खाद्यतेलाचा वापर कमी केला जाईल. आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांमार्फत घराघरांमध्ये समुपदेशन केले जाईल. तसेच आयात होणाऱ्या पाम किंवा सूर्यफूल तेलाऐवजी स्वदेशी मोहरी आणि शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन दिले जाईल.

पीएनजी (PNG)चा विस्तार : हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना अनिवार्यपणे पीएनजी वापरण्यास प्रवृत्त केले जाईल आणि प्रलंबित पीएनजी जोडण्यांना तातडीने मंजुरी दिली जाईल.

उज्ज्वला योजनेचे शुद्धीकरण : प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि सर्वसाधारण ग्राहकांमधील बोगस, दुबार किंवा स्थलांतरित ग्राहकांची नोंदणी रद्द करून लाभार्थ्यांपर्यंत गॅस पोहचवला जाईल.

नैसर्गिक शेतीला बळ : रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी आणि युरियाचा गैर–शेती कामांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कृषी विभाग मोठी मोहीम राबवणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीक पद्धती आणि नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जाईल.

निष्कर्षः– महाराष्ट्र शासनाचे हे परिपत्रक केवळ तात्पुरती मलमपट्टी नसून, भविष्यातील मोठ्या संकटाला तोंड देण्याची पूर्वतयारी आहे. प्रशासकीय खर्चात कपात करणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि स्वदेशी संसाधनांवर भर देणे यांमुळे राज्याला आर्थिक स्थैर्य लाभेल.

मंत्रालयीन विभागांपासून ते अगदी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि पोलिसांपर्यंत सर्वांना या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचे पालन करणे ही जबाबदारी केवळ प्रशासकीय यंत्रणेचीच नव्हे, तर आता गरज आहे ती नागरिकांच्याही सक्रिय सहभागाची. जर आपण सर्वांनी मिळून या सूचनांचे पालन केले, तर हे 'संकट' आपण एका नव्या 'संधीत' बदलू शकू यात शंका नाही.

चला तर आपल्यासाठी, आपल्या कुटुंबासाठी, आपल्या समाजासाठी, आपल्या राज्यासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देवून राष्ट्राप्रति आपले राष्ट्रप्रेम सिद्ध करू या..! वैचारिक आणि प्रत्यक्ष कृतीतून सक्रिय योगदान देऊया...!

**–मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे/रायगड तथा उपसंचालक (माहिती) (अ.का), कोकण विभागीय माहिती कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई**

# स्वातंत्र्यसैनिक बिपिनचंद्र पाल

बिपिनचंद्र पाल हे लाल–बाल–पाल त्रयीतील एक स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८५८ रोजी पाईल (जि. सिलहेट– ढाका) या गावी झाला. त्याचे वडील रामचंद्रपाल हे पेशकार असून ते प्रखर देशभक्त व विशुद्ध चरित्राचे होते. ते स्वतः सनातनी असून मुलांनी पाश्चिमात्य शिक्षण शिकावे असे त्यांना वाटत होते. १८७९मध्ये शिक्षण पूर्ण होताच काही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली.

बिपिनचंद्र पाल यांचा जन्म उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात पॉइल (जिल्हा सिल्हेट) या गावी झाला. सध्या हा प्रदेश बांगलादेशात अंतर्भूत होतो. बिपिनचंद्र यांचे एकूण आयुष्य कष्टमय होते. विद्यार्थीदशेतच त्यांनी विपूल वाचन केले. ब्राम्होसमाजाचे केशवचंद्र सेन यांच्या विचारांची छाप त्यांच्यावर पडली. याशिवाय पी. के. रॉय, आनंदमोहन बोस, द्वारकानाथ गांगुली वगैरे विद्वानांचा प्रभाव त्यांच्यावर होता. सुरुवातीस त्यांनी शिक्षकी पेशा पत्करला. नंतर त्यांनी 'वंदे मातरम्' हे दैनिक सुरू केले. बिपिनचंद्र हे एक् तत्त्वचिंतक होते. त्यांना देशाची सर्वांगीण तयारी झाल्याशिवाय स्वातंत्र्य नको होते. त्यांची राष्ट्रीयत्वाची कल्पना धर्मभावनांशी निगडित होती. ते होमरुल लीगचे सभासद होते, बिपिनचंद्रांनी अनेक वृत्तपत्रे काढली. यातून त्यांनी आपले विविध विषयांवरील विचार मांडले. याशिवाय त्यांनी तत्कालीन थोर व्यक्तींचे चरित्रे लिहिली. पहाडी आवाजाचे वक्ते म्हणून त्यांची ख्याती होती. लाल–बाल–पाल या त्रयीने वंगभंग, स्वदेशी व बहिष्कराचे प्रचंड आंदोलन करून जनजागृती केली.

लाल–बाल–पाल त्रयीतील बंगालमधील सर्वश्रेष्ठ देशभक्त होते. त्याच्या कार्याचा गौरव करताना बाबू अरविंदो (अरविंद घोष) यांनी म्हणले आहे की, बिपीन चंद्र पाल हे राष्ट्रवादाचे सर्वात समर्थ प्रेषित व या देशातील सर्वोत्तम विचारवंत होते.

बिपिनचंद्र पाल हे बंदे मातरम् या नियतकालिकात ६ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर १९०६ या कालावधीत मुख्य संपादक म्हणून कार्यरत होते. १२ ऑक्टोबर पासून ते श्री. अरविंद यांच्याबरोबरीने सह–संपादक या नात्याने काम पाहू लागले. नोव्हेंबर १९०६ ते एप्रिल १९०८ या कालावधीत त्यांचा वंदे मातरम्शी असलेला संपर्क संपुष्टात आला, तर २० मे १९३२ रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### इन्स्टा स्टोरी डिलीट न करता आता थेट एडिटचा पर्याय

जर तुम्ही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्राम वापरत असाल, तर तुमच्यासाठी एक अत्यंत कामाची आणि आनंदाची बातमी आहे. अनेकदा घाईघाईत इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करताना स्पेलिंग मिस्टेक होते किंवा चुकीचा टॅग किंवा लिंक जोडली जाते. अशा वेळी ती चूक सुधारण्यासाठी पूर्ण स्टोरी डिलीट करून पुन्हा पोस्ट करावी लागायची, मात्र आता हा मनस्ताप कायमचा थांबणार आहे, कारण इन्स्टाग्रामने आता युजर्ससाठी थेट स्टोरी एडिट करण्याचा पर्याय आणला आहे.




सोशल मीडियावरील काही युजर्सनी याचे स्क्रीनशॉट्स शेअर करत या नव्या अपडेटची माहिती दिली आहे. सध्या हे फीचर काही निवडक युजर्ससाठी रोल आउट करण्यात येत असून लवकरच ते सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणार आहे.


व्हायरल झालेल्या स्क्रीनशॉट्सनुसार, स्टोरी पोस्ट केल्यानंतर युजर्सला त्या स्टोरीवर टॅप करावे लागेल. त्यानंतर एक नवा मेनू ओपन होईल, ज्यामध्ये 'Edit'चा पर्याय दिसेल. जेव्हा तुम्ही 'एडिट'वर क्लिक कराल, तेव्हा स्क्रीनवर एक वॉर्निंग पॉप–अप दिसेल. या वॉर्निंगमध्ये स्पष्ट लिहिले असेल की, एकदा तुम्ही एडिटिंग सुरू केल्यास स्टोरीचे मूळ व्हर्जन डिलीट होईल. तसेच, त्या स्टोरीवर आलेले लाईक्स, रिॲक्शन्स आणि कमेंट्स देखील रिसेट होतील. या फीचरमध्ये नेमके काय काय एडिट करता येईल याबाबतची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही.

इन्स्टाग्रामने हे जबरदस्त फीचर सध्या केवळ आयफोन वापरणाऱ्या मर्यादित युजर्ससाठीच रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे अँड्रॉईड युजर्सना या फीचरचा लाभ घेण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागू शकते. इंस्टाग्रामच्या मूळ कंपनीने अधिकृतपणे यावर अजून शिक्कामोर्तब केले नसले, तरी चाचणी यशस्वी झाल्यानंतर हे फीचर सर्वांसाठी उपलब्ध होईल, अशी दाट शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांत इन्स्टाग्रामने युजर्सचा अनुभव बदलण्यासाठी अनेक नवनवीन फीचर्स आणले आहेत. नुकतेच कंपनीने कमेंट केल्यानंतर १५ मिनिटांच्या आत ती एडिट करण्याचा पर्याय दिला होता. त्याशिवाय 'क्लोज फ्रेंड्स'साठी गायब होणारे फोटो पाठवण्याचे फीचरही आणले होते.

# श्रेष्ठ ग्रंथकार विष्णुशास्त्री चिपळूणकर

आधुनिक मराठी गद्याचे जनक म्हणून ओळखले जाणारे श्रेष्ठ मराठी ग्रंथकार. त्यांच्या अगोदर आधुनिक मराठी गद्य जवळजवळ अर्ध्या शतकाहून अधिक काळ निर्माण होत होते, परंतु त्यांनी त्याला अधिक प्रभावी स्वरूप प्राप्त करून दिले. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त (२० मे १८५०) जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



**निमित्त**

विष्णुशास्त्री यांचा जन्म पुण्याचा. मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा पुण्याच्या 'डेक्कन कॉलेजा'तून ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुणे व रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळांतून त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री हे संस्कृतज्ञ. इंग्रजी साहित्याचे जाणकार, रसिक, विद्वान आणि चतुरस्त्र मराठी लेखक असल्यामुळे विष्णुशास्त्र्यांनाही लेखनवाचनाची गोडी लागली. कृष्णशास्त्र्यांनी चालविलेल्या शालापत्रक या मासिकातून विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाचा आरंभ झाला व त्यानंतर काही वर्षांतच ते या मासिकाचे संपादकही झाले. तथापि, त्यांच्या संपादकीय कारकीर्दीत शालापत्रकातून सरकार व ख्रिस्ती मिशनरी यांच्यावर त्यांनी केलेल्या खोचक टीकेचा गवगवा होऊन शालापत्रक बंद पडले. सरकारी नोकरीत असतानाच त्यांनी निबंधमाला हे सुप्रसिद्ध मासिक काढले. तसेच ज.बा. मोडक आणि का.ना. साने यांच्या सहकार्याने काव्येतिहाससंग्रह हे मासिक सुरू केले. आपल्या देशातील लोकांनी रचिलेली काव्ये, लिहिलेले इतिहास, बखरी असे साहित्य प्रसिद्ध करून त्यामार्गे देशसेवा करणे हा हे मासिक काढण्यामागील हेतू होता.

तथापि, या मासिकावर विष्णुशास्त्र्यांनी संपादक म्हणून आपले नाव घातले नव्हते. १८८०मध्ये नव्या पिढीच्या मनावर देशाभिमानाचे संस्कार करण्यासाठी टिळक–आगरकरांच्या सहकार्याने त्यांनी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' ही ख्यातनाम शाळा स्थापन केली. त्याच वर्षी कडव्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी दोन वृत्तपत्रे – केसरी हे मराठी आणि मराठा हे इंग्रजी– त्यांनी काढली. याशिवाय चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबखाना यांसारखे समाजशिक्षणोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले. निबंधमाला हे विष्णुशास्त्र्यांचे प्रमुख जीवितकार्य. निबंधमालेच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत निघालेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ८४ अंकांतील लेखन विष्णुशास्त्र्यांनी जवळजवळ एकटाकी केले. लोकभ्रम, अनुकरण, गर्व ह्यांसारखे विषय त्यांच्या सामाजिक लेखनात आलेले आहेत. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य हे दोन लेख त्यांच्या राजकीय लेखनापैकी विशेष उल्लेखनीय होत.

स्वमताविषयी तारुण्यसुलभ अभिनिवेश आणि परमतखंडनातील धारदार उपहास–उपरोध, सुभाषितांचा मार्मिक उपयोग, पल्लेदार वाक्यरचना ही त्यांच्या शैलीची काही लक्षणीय वैशिष्ट्ये. या लेखनाने मराठी गद्याला प्रौढता आणली अनेकांना राष्ट्रभक्तीची, इतिहाससंशोधनाची आणि साहित्यसेवेची प्रेरणा दिली. राजकीय वा सामाजिक चळवळीत ते प्रत्यक्ष पडले नाहीत आपला परंपराभिमानी राष्ट्रवाद जोपासण्याच्या भरात प्रार्थनासमाज, आर्यसमाज,सत्यशोधक समाज, आंग्लशिक्षित सुधारक मंडळी, ख्रिस्ती धर्मोपदेशक यांना सरसकट परधार्जिणे ठरवून त्यांनी अनुदार टीका केली. पुणे येथे २० मे १८५० रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### अशक्तपणा जाणवतो–थकवा येतो? या पाच गोष्टी करा...

व्हिटामीन डी शरीरातील एक महत्त्वाचा भाग आहे. आहारात काही पदार्थांचा समावेश करून तुम्ही व्हिटामीन डीची कमतरता भरून काढू शकता. याव्यतिरिक्त आहारात बदल, व्यायाम आणि प्राकृतिक सप्लिमेंट्चा आहारात समावेश करून तुम्ही व्हिटामीन्सची कमतरता पूर्ण करू शकता...



सतत थकवा येणं, अशक्तपणा जाणवतो, पाठीत सांध्यांमध्ये आणि हाडांमध्ये सतत वेदना होतात. केस खूप जास्त प्रमाणात गळतात. जखम लवकर बरी होत नाही, वारंवार आजारी पडण्याचा धोका उद्भवतो.

व्हिटामीन डी ची कमतरता कशी पूर्ण करावी?

१) सूर्यप्रकाश हा व्हिटामीन डी चा सर्वात मोठा आणि मोफत स्त्रोत आहे. आपलं शरीर स्वतःहून अन्नातून पुरेसं व्हिटामीन डी बनवू शकत नाही. जोपर्यंत त्याला सुर्यप्रकाश मिळत नाही. यासाठी दररोज सकाळी किंवा संध्याकाळी कोवळ्या उन्हात १५ ते २० मिनिटं बसायला हवं. रोज सकाळी १० ते ३ या दरम्यान १५ ते २० मिनिटांसाठी उन्हात बसा. उन्हात हात आणि चेहरा ठेवल्यानं त्वचा प्राकृतिक स्वरूपात व्हिटामीन डी तयार करते.

२) मशरूम उन्हाच्या आणि युव्ही किरणांच्या संपर्कात येतात. त्यामुळे मशरूम खाल्ल्यानं व्हिटामीन डी ची कमतरता पूर्ण होण्यास मदत होते.

३) शाकाहारी लोकांनी व्हिटामीन डी युक्त फोर्टीफाईड खाद्यपदार्थ जसं की दूध, दही, ओट्स, संत्री या पदार्थांचा आहारात समावेश करायला हवा.

४) पनीर आणि चीज यामध्ये कॅल्शियमसोबतच थोडे व्हिटामीन डी देखील असते. मर्यादीत प्रमाणात स्वंयपाकात या पदार्थांचा वापर फायदेशीर ठरू शकतो. तुमच्या शरीरात व्हिटामीन डी ची खूपच जास्त कमतरता असेल तर फक्त अन्नातून ती भरून काढणं कठीण होतं अशावेळी डॉक्टरांच्या सल्ल्यानं व्हिटामीन डी चे सप्लिमेंट्स घेणं हा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे.

५) अनेक अभ्यासांतून असं दिसून आलं आहे की १०० टक्के शाकाहारी अन्नातून शरीराची व्हिटामीन डी ची कमतरता पूर्ण करणं कठीण असतं, म्हणून वर्षातून एकदा व्हिटामीन डी ची रक्त तपासणी करून घ्या. डॉक्टरांच्या सल्ल्यानं व्हिटामीन डी–३ चे सॅशे किंवा गोळ्या सुरू करा. या गोळ्या सहसा आठवड्यातून एकदा दुधासोबत घ्या.

# खोपोलीत जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी रस्त्यावर!

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील गुडलक चौकात आज सकाळी जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी रस्त्यावर आले, त्यामुळे शहराच्या अनेक भागात पाणीपुरवठा यंत्रणा विस्कळीत झाली. व पाण्या वाचून नागरिकांची सकाळ विस्कळीत झाली.

गुडलक चौकार महानगर गॅस कंपनीचे पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असताना खोद काम करत असताना जवळच असणाऱ्या जलवाहिनीला जेसीबी यंत्राचा धक्का लागून जलवाहिनी फुटली आणि मुंबई पुणे जुन्या महामार्गावर पाणीच पाणी पाहावयास मिळाले. उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पाणीपुरवठा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाचारण केले व युद्ध पातळीवर दुरुस्तीचे काम करण्याचे आदेश दिले.



दरम्यान, त्याच वेळी भुयारी गटार मार्गावरील जलवाहिनीचे नवीन वॉल बसवण्याचे काम सुरू होते. हे काम रात्री सुरू करण्यात आले परंतु सकाळपर्यंत काम पूर्ण होऊ शकले नाही या दोन्ही घटनांमुळे खोपोली शहरात पाणीपुरवठा यंत्रणा विस्कळीत झाली. त्यानंतर दुपारी बाराच्या दरम्यान लव्हेज व परिसरातील भागाला पाणीपुरवठा सुरू करण्यात आला त्यानंतर हळूहळू शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा दुपारपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करण्यात पाणीपुरवठा विभागाला यश आले

शासनाच्या विविध यंत्रणाचे काम सुरू असताना त्यासंबंधीची माहिती खोपोली नगर परिषद प्रशासनाला देणे आवश्यक आहे, त्यामुळे आम्ही सतर्क राहू, अन्यथा आजचा प्रसंग पुन्हा होऊ नये यासाठी शासनाच्या संबंधित विभागाने काळजी घ्यावी, तरीपण नगर परिषदेचे नुकसान केल्याच्या पार्श्वभूमीवर महानगर गॅस या कंपनीला आम्ही दंडाची रक्कम वसूल करणार असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगण्यात आले.

खोपोली नगर परिषद हद्दीत जीर्ण झालेल्या जल वाहिनी असल्याने त्याचप्रमाणे नागरीवस्ती त पाणीपुरवठा करणाऱ्या छोट्या पाईप लाईन फार जुन्या असल्याने अनेकदा त्या लिकेज दिसून येत नाही, नागरिकांची तक्रार आली तर पाणीपुरवठा विभागाला त्याची माहिती मिळते परंतु त्यामुळे बरेच पाणी लिकेज असल्याने पुरेसा पाणीपुरवठा करण्यावर मर्यादा येते, तरीपण आमच्या विभागातर्फे अशा जीर्ण झालेल्या जलवाहिनी तपासाचे काम सुरू असल्याचे पाणीपुरवठा सभापती तथा उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

# सोशल मीडियावर बदनामी करणाऱ्या आरोपीला उत्तर प्रदेशमधून अटक

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील हॉटेल मालक व त्याचा कामगार यांची सोशल मीडियावर बदनामी केल्याप्रकरणी कामगाराच्या पत्नीने पेण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने आरोपीस उत्तर प्रदेश येथून अटक करण्यात आली आहे

या प्रकरणी सविस्तर वृत्त असे की, आरोपी हेमंत अरूण पलीये वय ४० वर्षे रा- ता. उमरेड जि. नागपुर यांने काहीएक कारण नसतांना फिर्यादी यांचे पती व फिर्यादी यांच्या नावाची बदनामी करण्याकरीता २६ मार्च २०२६ रोजी व्हॉट्सअँपच्या स्टेटसला आक्षेपार्ह मजकूर ठेवला होता त्यानंतर हॉटेल स्टाफ कही, ना कही वापस मिलता है .मुकेश शेफ लकीन भारत और जिवन मुझे दोबारा मिलेंगे तो दोनो काम करने लायक नही होंगे ये मेरी गारंटी हैं असे लिहिले होते.

यानंतर दि. २७ मार्च रोजी त्याने फिर्यादी यांचे पती प्रवीण पाटील यांचे मोबाईलवर आक्षेपार्ह मेसेज पाठविला की, अपने हॉटेल का जो जनरल प्रविण उसकी औरत धंदा करती है अत्ता बघ फेसबुकवर अशा प्रकारे फिर्यादी यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे मेसेज ठेउन फिर्यादी व



त्यांचे होणारे पती प्रविण रामचंद्र शिंगटे यांची तसेच हॉटेल मालक बदनामी कैली

या प्रकरणी आरोपीला हजर राहण्याबाबत त्याचे राहते पत्त्यावर, त्याचे मोबाईलवर, वेळोवेळी नोटीस पाठवून, पेण पोलीस ठाण्याच्या पथकाव्दारे कळविले असता, तो गुन्हयाचे तपासकामी हजर न राहता गुन्हयाचे कामी सहकार्य न करता उडवाउडवीचे उत्तरे देवुन आरोपी हा त्याचे स्वतः चे अस्तित्व लपवून ठेवत होता.

तपास पथकाने त्याच्या मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण करुन त्याचा ठावठिकाणाबाबत माहिती प्राप्त करुन, त्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक पोलीसांची मदत घेवुन बिसरक पोलीस स्टेशन जिल्हा गौतमबुध्दनगर राज्य उत्तरप्रदेश हद्दीत मिळुन आला. त्यास गुन्हयाचे तपासकामी अटक केली, सदर गुन्हयाचा पुढील तपास सदिप बागुल पोलीस निरीक्षक पेण पोलीस ठाणे हे करीत आहेत.

# केळशी वानस्ते संगम पुलाच्या कठड्याची दुरवस्था

## दुरूस्ती करण्याची प्रवाशांतून मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील तळा-तळेगाव मार्गावरील केळशीवानस्ते येथील संगम पुलावरील रॅलींगचे पाईप निघाल्याने कठडे दुरुस्तीची मागणीला जोर चढताना पहावयास मिळत आहे.

सदर रस्त्यावरून तळेगाव, पन्हेळी, मालुक, भानंगकों, उसर व पुढे माणगाव,तसेच माणगाव साईकडे मोठ्या प्रमाणात वाहने या पुलावरून जात असतात. कठडे तुटले असल्याने केव्हाही अपघात होण्याचा धोका संभवतो तरी सदर पुलाचे कठडे हे तुटलेले असून ते लवकरात लवकर दुरुस्त व्हावेत, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.



रात्रीच्यावेळी अपघात होण्याचा धोका आहे.याच पुलावरून पावसाळयात मुसळधार पाऊस मोठ्याप्रमाणात पडला की पुलावरून पाणी जातो त्यामुळे ही या पुलाचे कठडे असणे आवश्यक असल्याचे जाणकार म्हणत आहेत.

ज्या नदीवरती पुल आहे. त्या संगमाच्या पुलावरून पावसाळयात पाणी जाते त्यावेळी वहातुक ठप्प होते व तळा शहरासी काही गावांचा संपर्क तुटतो.हे पाणी संगमाच्या पुलावरती येण्याचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने या नदीचे पात्र खोल करणे ज्यामुळे पाणी पुलाखालून अधिक प्रमाणात जाईल असे या भागातील जाणकांरतून बोलले जात आहे.याच पुलाच्या पश्चिमेकडील भागाच्या कॉक्रीटीकरणाचा स्लॅबमधील आतील स्टील दिसत आहे.हा देखील धोका असून त्यांचीही दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

# पेणमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पेण :** तालुक्यातील वाशी येथील सागर विद्यालय वाशी शाळेचा माजी विद्यार्थी संघाचा स्नेहमेळावा नेचर टच या फार्महाऊसवर शाळेच्या जुन्या गोड आठवणींत नुकताच झाला. या स्नेहमेळाव्यास सुनील पाटील, मिताली म्हात्रे, संतोष पाटील, प्रसाद पाटील, रोशन म्हात्रे, दिनेश थवई, संदेश ठाकूर, शुभदा शिर्के, राजेश्री पाटील, वैभव पाटील, संदीप पाटील, अजित म्हात्रे, योगिता पिंगळे सुशील पाटील, विकल पाटील, गिरीष म्हात्रे, प्रवीण केणी शनिदास पाटील, पुष्पा कोठेकर, जयंद्रथ पाटील, सुष्मा थवई -केणी, अविनाश म्हात्रे, विजय विठोबा म्हात्रे, निलेश म्हात्रे, रणजित पाटील, सरिता पाटील, गणेश ठाकूर, प्रवीण ठाकूर, शिल्पा ठाकूर, श्रीकांत पाटील, शुभांगी ठमके, सुभाष पाटील यावेळी उपस्थित होते.


**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पनवेल यांचे समोर**

सहाय्यक निबंधक, सहकारी सस्था, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मागे, रायगड बाजाराच्या बाजुला, पनवेल, जि.रायगड ४१०२०६

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस**

दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या बँकेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरुद्ध थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वा नुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे या जाहीर नोटीसी द्वारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्या बाबत अंतिम सुनावणी २१/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल दिला जाईल व त्यानंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही

| अ.क्र | दावा क्रमांक | कर्जदार / सहकर्जदार | संपूर्ण पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ४०९ २०२६-२७ | श्री. गणेश श्रीरंग कांबळे (स्वतः कर्जदार) | रा.मु. घर नं टी - २०, रूम नं. ०२ वाल्मिकी नगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | १,०५,२१३/- |
| | | श्री. सुरज राजू डिंग्या (जामीनदार नं. १) | रामु घर नं. ४ म्युन्सिपल चाळ, जुना ठाणा नाका, वाल्मिकीनगर, परदेशी आळी, पनवेल, रायगड ४१०२०६ | |
| | | श्री. अजय ओमपाल टाक (जामीनदार नं. २) | हॅप्पी होम सोसायटी, रूम नं. ०१, महाराणा प्रताप रोड, पनवेल, रायगड | |

**(सही sd/-)**
**(प्रशांत पाटील)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल**



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**महापालिका सचिव कार्यालय**

जा.क्र. : पमपा/सचिव/२०२६/प्र.क्र.०५/ १९९/२०२६ दिनांक : १९/०५/२०२६

**शुद्धीपत्रक**

**प्रति,**
**श्री./श्रीमती**
**सदस्य/सदस्या,**
**पनवेल महानगरपालिका**

**विषय :**
**पनवेल महानगरपालिकेची दि.२०/०५/२०२६ रोजी आयोजित सर्वसाधारण सभा स्थगित करणेबाबत.**

**संदर्भ :** १. भारत निर्वाचन आयोग यांची १८ मे २०२६ ची प्रेस नोट-ECI/PN/०८७/२०२६
२. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२६/प्र.क्र.३८/३३(नि.-११), दिनांक १८ मे, २०२६.
३.सर्वसाधारण सभा क्र.५ दि.२०/०५/२०२६ ची विषयपत्रिका

**मा. महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ अन्वये, महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा भारत निवडणूक आयोगामार्फत करण्यात आलेली असून रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू झालेली आहे.

त्याअनुषंगाने पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुचना क्र.५ अन्वये बुधवार, दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह", पनवेल येथे आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा आचारसंहिता कालावधीसाठी स्थगित करणेत येत आहे. तरी स्थगित सभेची पुढील सुचना मा. सदस्य / सदस्या यांना यथावकाश अवगत करण्यात येईल.

**(मा. महापौर यांचे आदेशान्वये व मंजूरीने)**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**


# वीज पडून मृत्यू झालेल्या वेदांत भोसलेच्या कुटुंबाला अर्थसहाय्य

## शासनाकडून चार लाखाची मदत सुपूर्द



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील कर्नाळा गावात अवकाळी पावसादरम्यान वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या १४ वर्षीय वेदांत भोसले याच्या कुटुंबियांना शासनाकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

९ मे २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पावसादरम्यान वीज कोसळल्याने वेदांतचा जागीच मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच तळा प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व कुटुंबियांचे सांत्वन केले. तसेच शासनाकडून तातडीने मदत देण्याचे आश्वासन दिले होते. १२ मे रोजी तहसिलदार स्वाती पाटील, पंचायत समिती उपसभापती रवींद्र मांडवकर व सामाजिक कार्यकर्ते रामदास मोरे यांच्या हस्ते संबंधित कुटुंबाला चार लाख रुपयांची मदत सुपूर्द करण्यात आली. वेदांत हा इयत्ता आठवीत शिक्षण घेत होता. अभ्यासात हुशार आणि भविष्यासाठी मोठी स्वप्ने पाहणारा वेदांत अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. त्याच्या निधनाने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून तालुक्यातून सर्वस्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.


**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/ गाळा/ बंगला क्र................. ....धारण करणाऱ्या **श्रीमती सुनंदा सुधाकर सावंत** यांचे तारीख २७/१२/२०२६ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल.
दिनांक : १९/०५/२०२६

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल



**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा**
(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address : Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

फा. / KV NAD KARANJA / 2026-2027 / दिनांक : 19.05.2026

**प्रवेश सूचना ( सन 2026-2027)**

यह सूचित किया जाता है कि पीएम श्री केन्द्रीय विद्यालय, एनएडी करंजा, उरण रायगड में सत्र २०२६-२७ में **कक्षा ५, कक्षा १०, कक्षा ११ (वाणिज्य संकाय), कक्षा ११ (मानविकी संकाय), कक्षा १२ (विज्ञान संकाय), कक्षा १२ (वाणिज्य संकाय) तथा कक्षा १२ (मानविकी संकाय)** में कुछ स्थान रिक्त हैं। इन रिक्त सीटों को भरने हेतु ऑफलाइन पंजीकरण दिनांक २०.०५.२०२६ को प्रातः १०:०० बजे से प्रारम्भ होगा तथा पंजीकरण की अंतिम तिथि **२४.०५.२०२६**को दोपहर २:०० बजे तक निर्धारित है। "प्रवेश केन्द्रीय विद्यालय संगठन की प्रवेश मार्ग दर्शिका २०२६ २७ के अनुसार होगा। रिक्तियों की संख्या परिवर्तनीय है तथा केवल पंजीयन से प्रवेश का अधिकार सुनिश्चित नहीं है।

" इच्छुक अभिभावक आवेदन पत्र, विद्यालय की वेबसाइट **http://nadkaranja.kvs.ac.in** के अद्यतनीकरण/What's New में जाकर डाउनलोड कर, पूर्णतः भरे आवेदन के साथ समस्त आवश्यक दस्तावेज संलग्न कर विद्यालय में कार्य दिवसों में प्रातः १०:०० बजे से दोपहर २:०० बजे तक जमा कर सकते हैं।

अपूर्ण, असत्य अथवा एक से अधिक आवेदन पाने पर पंजीकरण निरस्त कर दिया जाएगा तथा इस संबंध में कोई भी पत्राचार नहीं किया जाएगा।

**सहीं/-**
**प्राचार्य**
**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय, एनएडी करंजा, उरण रायगड**

# फ्लेमिंगो तलावांना पाणथळ दर्जा नाकारला

## मुख्यमंत्र्यांनी दिले जागेच्या चौकशीचे आदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरणवाद्यांच्या तक्रारीनंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे जिल्ह्यातील आठ तलावांना पाणथळ दर्जा नाकारल्याप्रकरणी विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत. यामध्ये नवी मुंबईतील एनआरआय आणि टी. एस. चाणक्य फ्लेमिंगो तलावांचाही समावेश आहे.

पर्यावरणविषयक कार्य करणाऱ्या नॅटकनेक्ट फाउंडेशनने ठाणे जिल्हा पाणथळ समितीच्या निष्कर्षाला आक्षेप घेत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली होती. संबंधित जलाशयांना पाणथळ म्हणून घोषित करता येणार नाही, असा निष्कर्ष समितीने काढला होता.आपला ई-मेल संबंधित अधिकाऱ्यांकडे विभागीय चौकशीसाठी पाठविण्यात आला आहे, असा प्रतिसाद मुख्यमंत्री कार्यालयाकडून



देण्यात आल्याची माहिती नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी दिली.

मुख्यमंत्री कार्यालयाने ही तक्रार पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज आणि वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्याकडे पाठवली. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी उपसचिव निकिता पांडे यांच्याकडे प्रकरण वर्ग करण्यात आले.

नॅटकनेक्टने आपल्या निवेदनात जिल्हा समितीची भूमिका "स्पष्टपणे चुकीची" असल्याचे म्हटले आहे. राज्य वन विभागाच्या नोंदींनुसार एनआरआय आणि टी. एस. चाणक्य पाणथळ क्षेत्रे ही ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या उपपरिसंस्थेचा भाग असल्याचा दावा संस्थेने केला आहे.वन्यजीव संस्थेच्या अभ्यासांचाही हवाला देत नवी मुंबईतील डीपीएस फ्लेमिंगो तलावासह विविध पाणथळ क्षेत्रांचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

पर्यावरणवाद्यांनी आरोप केला की, पाणथळ क्षेत्र निश्चित करण्याचा अधिकार राज्य पाणथळ प्राधिकरणाकडे असल्याचे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने स्पष्ट केले असतानाही समितीने शहर विकास प्राधिकरणाच्या मतावर चुकीच्या पद्धतीने अवलंबून राहिले.नवी मुंबई पर्यावरण संरक्षण संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेतील मुंबई उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांनाही समितीचा अहवाल विरोधाभासी असल्याचा दावा करण्यात आला आहे.

"न्यायालयाने या जलाशयांकडे संवेदनशील पर्यावरणीय परिसंस्थेचा भाग म्हणून पाहिले असून त्यांचे संरक्षण आणि पुनर्स्थापना आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते," असे संस्थेचे संदीप सरीन यांनी सांगितले. या भागातील पर्यावरणीय हानी रोखण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यकर्त्यांनी असेही निदर्शनास आणले की, उच्च न्यायालयाच्या आदेशाला शहर विकास प्राधिकरणाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याचा उल्लेख समितीच्या अहवालात नाही.

बी. एन. कुमार यांनी राष्ट्रीय शाश्वत सागरी किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राच्या शिफारशींकडेही समितीने दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. संस्थेकडून केवळ पाणथळ क्षेत्राची माहिती घेण्यात आली, मात्र वैज्ञानिक शिफारशींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले.

कार्यकर्त्या ज्योती नाडकर्णी यांनी इशारा दिला की, या तलावांना पाणथळ संरक्षणातून वगळल्यास फ्लेमिंगोंच्या अधिवासाला धोका निर्माण होऊ शकतो आणि वेगाने होणाऱ्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर प्रदेशाची पर्यावरणीय सहनक्षमताही कमकुवत होऊ शकते.

# द्रोणागिरीत विराट हिंदू संमेलन

## ▪ जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दणाणला

**उरण : बातमीदार**

हिंदू धर्माविषयी जनजागृती व्हावी, हिंदू धर्मातील व्यक्ती, नागरिकांनी एकत्र यावे, हिंदू समाजाचे मजबूत संघटन उभे राहावे या दृष्टिकोनातून तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशभर हिंदू संमेलनांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाज द्रोणागिरी उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले विराट हिंदू संमेलन प्रचंड जल्लोषात आणि उत्साहात संपन्न झाले. रविवारी (दि.१७) सायंकाळी ६ वाजता सेक्टर ५०, द्रोणागिरी येथील देवकृपा सोसायटीसमोर हा भव्य सोहळा पार पडला.

या संमेलनाला द्रोणागिरी आणि उरण परिसरातील हिंदू समाज अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होता. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे यात कोणताही राजकीय पक्ष किंवा मान-सन्मान हा विषय नव्हता. राजकीय अजेंडा बाजूला ठेवून केवळ हिंदू धर्माबद्दल कमालीचा आदर आणि निष्ठा जपण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेच्या भव्य दिंडी सोहळ्याने झाली. या दिंडीसोबत सुरू असलेला हरिपाठ, अभंगांचे सूर आणि हातात घेतलेले भगवे झेंडे यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. दिंडीच्या



माध्यमातून संपूर्ण द्रोणागिरीमध्ये अभूतपूर्व भगवे चैतन्य निर्माण झाले होते. दिंडी परतल्यानंतर व्यासपीठावर रामभक्तीपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम बालचमूंनी सादर केले. शंखवादन गणेश वंदनेने उपस्थितांची मने जिंकली. जय श्रीराम, गर्व से कहो हम हिंदू है, छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि छत्रपती संभाजी महाराज की जय, या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण द्रोणागिरी परिसर दणाणून गेला होता. या कार्यक्रमात डॉ. निवेदिता भदाणे यांनी सादर केलेला अप्रतिम कथक नृत्य आविष्कार सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

संमेलनात रमेश यादव महाराज यांनी सनातन हिंदू धर्माविषयी प्रखर विचार मांडले तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगातील रचनेचा दाखला देत त्यांनी उपस्थितांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. महामंडलेश्वर रामकृष्ण सरस्वती महाराज यांनी हिंदू धर्माला वाचवण्यासाठी काय करावे लागेल यावर सखोल प्रकाश टाकला.

# कोमसाप उरणचा मधुबन कट्टा साहित्यिक, समाजसेवकांचे प्रेरणास्थान -नागेंद्र म्हात्रे



**उरण : बातमीदार**

साहित्यिकांच्या आणि समाजसेवकांच्या कार्याचा गौरव करून सतत साडेदहा वर्षे कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) मधुबन कट्ट्यावर नवोदितांना प्रेरणा देण्याचे कार्य अभिनंदनीय आहे, असे विचार कोमनादेवी संस्थेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले. ते कट्ट्याच्या १२७व्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी साहित्यरत्न प्रा. एल. बी. पाटील, चंद्रकांत मुकादम, प्रकाश म्हात्रे, बाजी घरत, भुवनेश पाटील, दत्ता निळवर्ण, रमाकांत घरत, अनंत पाटील, सुरेश गायकवाड, मिना बिस्ट, श्रुती म्हात्रे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी अंधश्रद्धा निर्मूलन समाजसेवक रमाकांत घरत, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकार विठ्ठल ममताबदे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष सन्मानाने गौरवण्यात आले. शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, मधुबनचे अध्यक्ष राम म्हात्रे, सचिव अजय शिवकर, केंद्रीय सचिव संजय होळकर यांनी कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. सूत्रसंचालन शिवप्रताप पंडित यांनी केले.

# नवी मुंबई मनपाची सर्वसाधारण सभा स्थगित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतून १६ स्थानिक प्राधिकरण मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने १८ मी रोजी जाहीर केल्याने आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेची बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणारी सर्वसाधारण सभा व तहकूब सभा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

महापालिका सचिव कार्यालयाकडून याबाबत निवेदन प्रसिद्ध करण्यात आले असून, सभेची पुढील तारीख व वेळ याबाबतची माहिती नंतर कळविण्यात येणार असल्याचे पालिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# नवी मुंबई ग्लोबल समिटची शानदार सांगता

**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन मुंबईमधील यू बिझनेस मीट यांच्या वतीने आयोजित नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट २०२६चे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील उद्योजकांनी उपस्थित रहात या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भारत आणि थायलंड यांच्या दरम्यान व्यापार उद्योजकता वृद्धिंगत व्हावी या हेतूने या बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड या दोन देशातील व्यवसाय निष्णात प्रभुतींच्या चर्चांमधून अनेक नवनवीन उद्योजक आणि व्यापार संधी उदयास येण्याचे यामुळे चिन्ह निर्माण झाली आहेत.

बेलापूर येथील दि पार्क या तारांकित हॉटेलमध्ये सोमवार दिनांक १८ मे रोजी हे समिट संपन्न झाले. विविध व्यवसाय आस्थापनांना व्यवसाय सुलभता प्रदान करण्याच्या हेतूने यू बिझनेस मिट ही संस्था काम करत असते. फाउंडर वैभव सोनटक्के आणि को फाउंडर रवींद्र प्रताप गुप्ता, मंदार दोंदे, विवेक पाटील, समृद्धी वाणी यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि थायलंड यांच्यामध्ये द्विदेशीय व्यवसाय सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये एक्सपोर्ट इम्पोर्ट, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, फार्मसीटीकल्स, लाइफस्टाइल अँड हेल्थकेअर, बँकिंग, इन्शुरन्स, इंटरनॅशनल मीडिया, रिअल इस्टेट,हॉटेल अँड हॉस्पिटॅलिटी, टुरिझम अशा क्षेत्रातील तज्ञ मंडळींच्या पॅनल डिस्कशनचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध पत्रकार महेश म्हात्रे आणि टाइम्स ऑफ इंडियाचे असिस्टंट एडिटर चित्तरंजन टेंभेकर, सिटी बेल समूह संपादक मंदार दोंदे यांनी मॉडरेटर म्हणून या पॅनल डिस्कशनमध्ये सुसंवाद घडवून आणला.

आमदार प्रशांत ठाकूर,निलेश म्हात्रे यांनी आवर्जून उपस्थित रहात नवी मुंबई ग्लोबल बिझनेस समिट या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

यु बिझनेस मीट चे फाउंडर आणि एन्जॉय को वर्किंग स्पेस, वेब प्रिंट सोल्युशन्स या संस्थांचे संचालक असणारे वैभव सोनटक्के यांनी या समिटच्या आयोजनासाठी अथक परिश्रम घेतले. तर या ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजनात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या समृद्धी वाणी यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# गोविंदराव शिंदे यांचे कार्य अलौकिक -विजय दिवाण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोविंदराव शिंदे यांच्या १७ व्या स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार स्वीकारताना विजय दिवाण म्हणाले की, गोविंदराव शिंदे यांनी सर्वोदयाचे कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनचे तसेच ग्राम स्वराज्य समितीचे केलेले कार्य हे जनतेसाठी खूप मोलाचे आहे. आदिवासींच्या जमीन प्रश्नावर तसेच मूलभूत प्रश्नांवर त्यांनी मोठे कार्य केले. ग्रामदान आणि भूदान यावर त्यांचे कार्य हे अलौकिक असून त्यांच्या नावाचा पुरस्कार मला दिला जातोय हा माझ्या कामाचा गौरवच आहे.

गोविंदराव शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी एका तळागाळात काम करणाऱ्या



कार्यकर्त्याला त्यांच्या नावाने पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. त्यामध्ये सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व ११ हजार १११ रुपये इतकी रक्कम पुरस्कार म्हणून दिली जाते. यंदाचा हा पुरस्कार विनोबांचे जन्मगाव गागोदे तालुका पेण, जिल्हा रायगड येथील कार्यकर्ते विजय दिवाण यांना देण्यात आला. ते ग्रामदान भूदान तसेच सर्वोदयचा विचार समाजामध्ये रुजवण्यासाठी प्रबोधनात्मक व कृतीत्मक कार्य सातत्याने करीत आहेत. गोविंदराव शिंदे हे ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्रचे अध्यक्ष होते. त्यांनी शहाद्यामध्ये तसेच पनवेल तालुक्यामध्ये आदिवासींची चळवळ उभी केली. त्यांच्या जमीन प्रश्नावर व इतर हक्कांवर मोठे काम उभे केले. त्यातून अनेकांना न्याय मिळवून दिला. त्यांचा आदर्श तरुणांनी घेतला पाहिजे, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते आबा कांबळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात अ‍ॅड. सुरेखा दळवी, धर्मेंद्र राजपूत, अ‍ॅड. प्रमोद ठाकूर, अल्लाउद्दीन शेख, रिटघरचे ग्रामस्थ साईनाथ भोपी, शिवणसईचे ग्रामस्थ जयवंत पाटील, माजी सरपंच रमेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते महादेव गायकर व इतरांनी गोविंदराव शिंदे यांच्याबरोबरच्या कामाच्या आठवणी सभेत मांडल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राम स्वराज्य समितीचे अध्यक्ष शंकर बगाडे यांनी, तर सूत्रसंचालन व आभार संस्थेचे सचिव अल्लाउद्दीन शेख यांनी मानले. या कार्यक्रमास प्रभाकर पाटील, चंदा कातकरी, राम गायकर, नितीन जोशी, साधना वैराळे, विनायक शिंदे, चॅम्पियन बेंडले, मीनाताई पलांडे, सोपान बर्डे, शोभा बोलाडे, संतोष बोलाडे आदी उपस्थित होते.

## अभीष्टचिंतन



**पनवेल : येथील महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना युवा नेते मयुर अशोक शेळके व सहकारी.**

# पथविक्रेता सदस्य समिती निवडणूक २९ मे रोजी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ व्दारे पोट कलम (१) व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ या राजपत्राव्दारे शहरांमधील पथविकेत्यांचे बाबत नियम व आदेश प्रसिद्ध केले होते. सदर शासनाच्या नियम आदेशामधील प्रकरण ४ मधील कलम १५ (भाग-१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शहरातील पथ विक्रेत्याचे सर्वेक्षणाव्दारे नोंदणीकृत पथविक्रेत्यांची मतदारयादी तयार करून त्यांची निवडणूक घेणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४ अ अन्वये एकूण ०८ सदस्यांची शहर फेरीवाला समिती स्थापन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या पथविक्रेता निवडणूक नियम प्रणालीमध्ये नमूद केलेल्या एकूण २० सदस्य संख्येध्ये ०८ पथविक्रेते सदस्य असणार आहेत. सदरचे ०८ पथविक्रेता सदस्य पथविक्रेता मधून निवडणुकीव्दारे निवडून द्यावयाचे आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ या शासन राजपत्राव्दारे अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, इमाव अल्पसंख्याक, विकलांग व्यक्ती व खुला प्रवर्ग या जातीय संवर्गचा उल्लेख केला आहे. तसेच १/३ हे महिलांना आरक्षण देण्यात यावे, असे नमूद केलेले आहे.

त्यापैकी एक जागा सर्व साधारण महिलांसाठी राखीव आहे. दि.१६/०४/२०२६ रोजी पथविक्रेत्यांच्या उर्वरित ०२ महिला राखीव जागा करीता आरक्षण सोडत पध्दतीने घेण्यात आली. यामध्ये ०१ जागा अनुसूचित जाती महिला व एक जागा इतर मागास प्रवर्ग महिलांकरीता याप्रमाणे सोडतीद्वारे निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे एकुण ०८ पथविक्रेत्यांच्या सदस्यांसाठी निवडणूक घेण्यात येणार असून त्याचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

# 'पाताळगंगे'च्या पाण्यावर जलपर्णी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदीकिनाऱ्यावरील गजानन महाराज मंदिराजवळील नदिपात्रात दोन एकरपेक्षा जास्त जलपर्णीचे जाळे पसरले असल्याने, पाताळगंगा नदीवर मासेमारी करून जीवन जगणाऱ्या आदिवासी व भोई बांधवांत नाराजी दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून नदीतील पाण्यावर जलपर्णीचे रान माजल्याने जणूकाही खेळाचे

मैदान असल्याचे वाटू लागले आहे. पाण्यावर असलेली ही जलपर्णी पाहून जंगल निर्माण झाल्याचा भास पाहणाऱ्यांना होत आहे.दरम्यान, गजानन महाराज मंदिराजवळ पाताळगंगेतील पाणी अडविले जाते. परंतू जलपर्णी वनस्पतीमुळे पाण्याचा प्रवाहावर परीणाम होत असून, या जलपर्णीत लहान जीव मृत होवून अडकून बसतात. या भागात जलपर्णी वनस्पती पाण्यात पसरल्याने, नदी न वाटता एखादे मोठे खेळाचे मैदान असल्याचा भास होत आहे.

# विधी भोरची समुद्राच्या लाटांवर स्वप्नांची भरारी!

**नवी मुंबई : बातमीदार**

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर अशक्य वाटणारे स्वप्नही सत्यात उतरवता येते, याचे जिवंत उदाहरण नवी मुंबईतील सानपाडा येथील युवा जलतरणपटू विधी नंदकुमार भोर हिने आपल्या अद्वितीय कामगिरीतून दाखवून दिले आहे. अवघ्या आठवीत शिकणाऱ्या या धाडसी मुलीने अरबी समुद्रातील खडतर आव्हान स्वीकारत 'धरमतर जेटी ते अटल सेतू' हा तब्बल ४२ किलोमीटरचा सागरी जलप्रवास केवळ ७ तास ३२ मिनिटांत पूर्ण करून नवा विक्रम आपल्या नावावर केला आहे.



१८ मे रोजी पहाटे ०२:११ वाजता विधीने धरमतर जेटीवरून समुद्रात उडी घेत आपल्या ऐतिहासिक मोहिमेला सुरुवात केली. काळोखाने व्यापलेला समुद्र, भरती-ओहोटीचे तीव्र प्रवाह, जेलीफिशचा धोका आणि समुद्रातील जहाजांची सततची वर्दळ अशा अत्यंत कठीण परिस्थितीतही तिचा आत्मविश्वास क्षणभरही डळमळला नाही. अपार मानसिक ताकद आणि अथक सरावाच्या बळावर तिने हा थरारक प्रवास यशस्वीरित्या पूर्ण करत सर्वांनाच थक्क केले.

या अभूतपूर्व यशामागे रुपाली रेपाळे स्विमिंग अकॅडमीच्या जागतिक दर्जाच्या जलतरणपटू रुपाली रेपाळे तसेच प्रशिक्षक अनिरुद्ध महाडीक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणाखाली विधीने केवळ जलतरणच नव्हे, तर संकटांवर मात करण्याची मानसिक तयारीही आत्मसात केली. विशेष म्हणजे, यापूर्वी फेब्रुवारी २०२६ मध्ये विधीने 'प्राँग लाइट हाऊस, कुलाबा ते अटल सेतू' हा २० किलोमीटरचा सागरी प्रवास अवघ्या ४ तास ०३ मिनिटांत पूर्ण करत आपल्या क्षमतेची चुणूक दाखवली होती.

अटल सेतू येथे पोहोचताच तिचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नगरसेवक निशांत भगत, शिवक्रांति प्रतिष्ठान ट्रस्ट भिवंडीचे डॉ. राजुभाऊ चौधरी, समाजसेवक मनोज मेहत्रे, प्रितेश कोळी मित्रपरिवार, नातेवाईक तसेच क्रीडाप्रेमी यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि अभिनंदनाच्या वर्षावात तिच्या पराक्रमाचा गौरव केला. त्या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अभिमान आणि प्रेरणेची भावना स्पष्ट दिसत होती.

सध्या फादर अग्नेल मल्टीपरपोज स्कूल, वाशी येथे आठवीत शिक्षण घेणारी विधी अभ्यासासोबतच जलतरणातही प्रचंड मेहनत घेत आहे. दररोज ५ ते ६ तासांचा कठोर सराव, जलतरण तलावातील नियमित प्रशिक्षण आणि समुद्रात विशेष सराव यामुळेच तिने हे यश संपादन केले.

विधीचा हा पराक्रम केवळ एक विक्रम नसून आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरत आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी जाणाऱ्या युवकांसमोर तिने मेहनत, शिस्त आणि ध्येयवेड यांचा आदर्श उभा केला आहे. तिच्या या यशामुळे नवी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील युवक-युवतींमध्ये साहसी क्रीडा आणि जलतरण क्षेत्राबद्दल नवचैतन्य निर्माण झाल्याचे विधीचे वडील नंदकुमार यानी यावेळी सांगितले.

# 'जनगणना यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे'

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

तहसीलदार मीनल भोसले यांनी पनवेल तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, जनगणना अधिकारी व कर्मचारी आपल्या परिसरात दिनांक १६ मेपासून भेट देतील त्यावेळी त्यांना योग्य, अचूक व संपूर्ण माहिती द्यावी तसेच प्रशासनास पूर्ण सहकार्य करावे.

भारत सरकारमार्फत देशभरात सन २०२७ची जनगणना प्रक्रिया राबविण्यात येणार असून ही प्रक्रिया देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जनगणनेद्वारे लोकसंख्या, शिक्षण, निवास, रोजगार, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यासंबंधी अचूक माहिती संकलित केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासात्मक योजना व धोरणे आखत असते. नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करून जनजागृती करण्यातही सहभाग घ्यावा.

# रेवदंडा-साळाव खाडी पूल प्रकल्पाला वेग; कोस्टल हायवेचा महत्त्वाचा दुवा साकारतोय

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा ते साळावदरम्यान कुंडलिका खाडीवर उभारण्यात येत असलेल्या पुलाच्या कामाला आता वेग आला आहे. हा पूल भविष्यात कोकण किनारपट्टीच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) माध्यमातून राबविण्यात येणारा हा प्रकल्प रेवस-रेड्डी कोस्टल हायवेचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जात आहे.



सध्या खाडीपात्रात पाइल फाउंडेशन व पिलर उभारणीची कामे युद्धपातळीवर सुरू असून अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने बांधकाम करण्यात येत आहे. सुमारे ३.८२९ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात जोडरस्त्यांसह आधुनिक चार मार्गिकांचा पूल उभारण्यात येणार आहे. पुलाची रचना ताशी ८० किलोमीटर वेगाने वाहतूक सुरळीत पार पडेल अशा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात येत आहे तसेच पुलावर आकर्षक विद्युत रोषणाई, पादचाऱ्यांसाठी फूटपाथ आणि युटिलिटी लाईन्सची स्वतंत्र सुविधा असणार आहे.

या पुलामुळे अलिबाग तालुक्यातील रेवदंडा आणि मुरुड तालुक्यातील साळाव यांच्यात थेट संपर्क प्रस्थापित होणार आहे. परिणामी अलिबाग, मुरुड, रोहा, श्रीवर्धन यांसारख्या शहरांमधील प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित होणार आहे. मुंबई आणि पुण्याहून मुरुड-जंजिरा, काशीद, रेवदंडा समुद्रकिनारा या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांचाही प्रवासाचा वेळही कमी होणार आहे.

५२३ किमी लांबीच्या आणि अंदाजे २६ हजार रुपये कोटी खर्चाच्या रेवस-रेड्डी कोस्टल हायवे प्रकल्पामध्ये एकूण नऊ मोठ्या खाडी पुलांचा समावेश आहे. धरमतर, आगरदांडा, बाणकोट, दाभोळ, जयगड, केळशी आणि काळबादेवी खाड्यांवरील पुलांसह रेवदंडासाळाव पुलालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या पुलाचे बांधकाम अशोका बिल्डकॉन लि.कंपनीकडून करण्यात येत असून भूमिपूजनानंतर कामाने चांगली गती घेतली आहे. सध्याचा जुना रेवदंडा पूल अरुंद आणि वाहतुकीस अपुरा ठरत असल्याने नवीन पुलामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

कोस्टल हायवे आणि हा नवीन पूल पूर्ण झाल्यानंतर कोकणातील पर्यटन, मत्स्यव्यवसाय, उद्योग, वाहतूक आणि स्थानिक व्यापाराला मोठी चालना मिळणार असून अलिबाग ते सिंधुदुर्ग किनारपट्टीवरील प्रवास अधिक आधुनिक आणि वेगवान होणार आहे.

## मुरूडमध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त मुरुड जंजिरा येथे आर्ट ऑफ लिविंग सुदर्शन क्रियेचे शिबिर संपन्न झाले .या शिबिरात ३० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. विविध उपक्रम साजरे करून गुरुजींचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या शिबिरात मुरुड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांनीसुद्धा सहभाग घेऊन गुरुजींचा वाढदिवस साजरा केला. गुरुदेवांचे कार्य गेली ४५ वर्ष अविरत १८३ देशांमध्ये सुरू आहे. त्यांच्या या कार्यामध्ये विशेषकरून सुदर्शन क्रिया योग ध्यान मेडिटेशन आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसांनी कसे राहावे हे गुरुदेव सोप्या भाषेमध्ये शिकवण्याचा प्रयत्न देशात; नव्हे तर जगभरात करत आहेत. यानिमित्ताने नुकतेच मुरुड शाखेतर्फे शिबिराचे आयोजन करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या शिबिरामधून ध्यान आणि योगाचा प्रसार, युवक विकास कार्यक्रम, ग्रामीण विकास आणि शिक्षण, पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक आपत्तीत मदतकार्य, शांतता आणि मानवी मूल्याचा प्रचार आदी विषयांवर प्रकाशझोत टाकण्यात येऊन प्रशिणार्थी यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या टीचर पल्लवी पाटील व सुस्मिता गुरव यांनी हे शिबिर आयोजित केले होते. त्यासाठी मंगेश पाटील व हसमुख जैन यांचे सहकार्य लाभले.







**महाड : कै. मारुती कृष्णाजी गोगावले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मातोश्री विठाबाई मारुती गोगावले यांच्या सौजन्याने महाड तालुका वारकरी सांप्रदायाच्या वतीने आयोजित भव्य कीर्तन महोत्सव मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत झाला. या महोत्सवाला शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# शिवराज्याभिषेक सोहळ्याचे काटेकोरपणे नियोजन करा -जिल्हाधिकारी किशन जावळे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे दुर्गराज रायगड येथे तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार २६ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनाची जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रमुख विभागांची दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित सर्व शासकीय यंत्रणेला दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, कार्यकारी अभियंता,सा.बां.विद्युत विभाग पेण, प्र.अ.दोडे, कार्यकारी अभियंता,विद्युत सा.बां.विभाग, अलिबाग पुजा जाधव, उप कार्यकारी अभियंता, बांधकाम जि.प.सचिन बैकर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.रत्नाकर काळे आदी प्रत्यक्ष तर जिल्ह्यातील शासकीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले की, शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रम सुनियोजित व सुव्यवस्थितपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वांवरच आहे. तेव्हा प्रत्येकाने आपले काम चोखपणे करावे. किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने वेगवेगळ्या समित्यांची नेमणूक केली आहे. मुख्यत्वे आरोग्य, पाणीपुरवठा, मंडप, खानपान, राजशिष्टाचार, परिवहन, विद्युत, पाणी आणि शौचालय आदी सर्व समित्यांची नेमणूक केली आहे. या समित्यांनी नेमून दिलेल्या कामांचे योग्य ते सूक्ष्म नियोजन करुन कार्यक्रम यशस्वीरित्या कशा प्रकारे होईल ते पाहावे.

कार्यक्रमाकरिता येणाऱ्या शिवभक्तांसोबत सलोखा ठेवावा. तसेच खर्च करताना काळजीपूर्वक खर्च करुन काटकसरीच्या धोरणाचा अवलंब करावा,असेही त्यांनी यावेळी सांगितले. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वैद्यकीय पथक सुसज्ज ठेवावे, गडावर पुरेश्या प्रमाणात वैद्यकीय पथक, स्ट्रेचर, औषधसाठा ठेवावा. विशेषतः सर्पदंश होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्याप्रमाणे औषधे उपलब्ध ठेवावीत. पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंडप, भोजन, विद्युत आणि आरोग्य व्यवस्था तैनात ठेवाव्यात. या सोहळ्यादरम्यान कोणतीही समस्या उद्भवू नये, या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली जावी. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सूचित केले. तसेच पार्किंगच्या जागा व तेथून गडाकडे जाणाऱ्या मार्गाची व्यवस्था संबंधित विभागांनी पूर्ण करावे आणि आवश्यक ते माहिती देणारे फलक लावले जावेत, असेही त्यांनी सांगितले.

## ज्ञान भारतम मोहीम : दुर्मीळ हस्तलिखितांच्या नोंदणीसाठी आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या वतीने देशभरात राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञान भारतम' या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभागाने केले आहे. या मोहिमेअंतर्गत दुर्मीळ हस्तलिखिते, प्राचीन पोथ्या, ताम्रपट तसेच पुरातत्व अभिलेखांचा शोध घेऊन त्यांची अधिकृत नोंदणी व दस्तऐवजीकरण करण्यात येत आहे.

महाराष्ट्राला समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला असला तरी इतर राज्यांच्या तुलनेत हस्तलिखितांची नोंदणी कमी प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आले आहे. राज्यातील अनेक धार्मिक, सामाजिक व कौटुंबिक सार्वजनिक न्यासांकडे मौल्यवान हस्तलिखिते, ग्रंथ व ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध असून त्यांचे संवर्धन व जतन करणे काळाची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक न्यासांचे अध्यक्ष, सचिव, विश्वस्त व व्यवस्थापक यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांच्या ताब्यात कोणतीही प्राचीन हस्तलिखिते, पोथ्या, ताम्रपट अथवा पुरातत्व अभिलेख असल्यास त्यांनी पुढाकार घेऊन त्यांची नोंदणी करावी. या प्रक्रियेमध्ये संबंधित हस्तलिखितांची मालकी न्यासाकडेच राहणार असून केवळ राष्ट्रीय स्तरावर त्यांचे दस्तऐवजीकरण होणार आहे.

हस्तलिखिते व पुरातत्व अभिलेखांच्या नोंदणीसाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

# युद्धजन्य आंतरराष्ट्रीय तणावामुळे इंधन टंचाईच्या भीतीने पेट्रोल पंपांवर वाहनांची गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

इराण आणि इस्त्रायल युद्धजन्य परिस्थिती व आंतरराष्ट्रीय तणावामुळे खनिज तेलाच्या किमती भडकल्याने पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. दरवाढीनंतरही शहरी व ग्रामीण भागातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची अभूतपूर्व गर्दी पहायला मिळत आहे. भविष्यात इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, या भीतीने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये 'पॅनिक बायिंग' (भीतीपोटी खरेदी) सुरू झाली असून बहुतांश वाहनधारक आपल्या वाहनांच्या टाक्या 'फुल्ल' करण्याला प्राधान्य देत आहेत.



आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचा (क्रूड ऑईल) पुरवठा खंडित होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने आगामी काळात इंधनाचे दर आणखी गगनाला भिडतील किंवा साठा संपेल अशी अफवा आणि भीती नागरिकांमध्ये पसरली आहे. परिणामी, नेहमी शंभर-दोनशे रुपयांचे पेट्रोल भरणारे दुचाकीस्वार आणि कारचालक थेट टाकी फुल्ल करून घेत आहेत.

या अचानक वाढलेल्या मागणीमुळे अनेक पेट्रोल पंपांवरील साठा वेगाने संपत चालला आहे. मर्यादित साठ्यामुळे पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक झळकू लागले असून अनेक वाहनधारकांना इंधनाविनाच माघारी फिरावे लागत आहे. याचा फटका रोजच्या प्रवाशांना आणि नोकरदारांना बसत आहे.

सुधागड तालुक्यातील रासळ येथील पेट्रोल पंप मालक प्रवीण खाडे यांनी सांगितले की, सध्या पंपावर येणारे प्रत्येक वाहनधारक पहिल्यांदा टाकी फुल करून देण्याची मागणी करत आहेत. यामुळे पंपावरील उपलब्ध साठा अपेक्षेपेक्षा खूप आधीच संपत आहे. अचानक वाढलेल्या या मागणीमुळे साठा नियंत्रित करणे कठीण झाले असून इतर सर्वसामान्य ग्राहकांना पेट्रोल देणे अशक्य होत आहे. नागरिकांनी संयम बाळगण्याची गरज आहे.

## खादी व ग्रामोद्योग मंडळाचे पुरस्कार जाहीर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने देण्यात येणारे मधुमित्र व मधुसखी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. जागतिक मधमाशी दिनानिमित्त 20 मे रोजी संभाजीनगर येथे आयोजित छोटेखानी कार्यक्रमात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. र

राज्यातील मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी तसेच मधपाळांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने 2023पासून या पुरस्कार योजनेची सुरुवात केली आहे. 2026 वर्षासाठी विविध जिल्ह्यांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मधपाळांची निवड करण्यात आली आहे.

यंदाच्या पुरस्कारासाठी लातूर येथील ज्ञानेश्वर मलीले, संभाजीनगर येथील गणेश बुरकुल, बुलढाणा येथील राजेंद्रदास बैरागी आणि पुणे येथील श्वेता वायाळ यांची निवड करण्यात आली आहे तसेच निवड समितीने विशेष सन्मानासाठी ठाणे येथील चंद्रकांत तरे, पुणे येथील संजय मारणे, कोल्हापूर येथील दयावान पाटील आणि जळगाव येथील विद्यानंद आहिरे यांची निवड केली आहे. पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे असून मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या माध्यमातून गौरविण्यात येणार आहे.



**श्रीवर्धन : येथील समुद्र किनाऱ्यावरील आसमंतात दाटून आलेले ढग जणू काही वरुणराजाच्या आगमनाचे संकेत देत आहेत. त्याची छायाचित्रकार अमेय नाझरे यांनी टिपलेली छबी.**

## अविनाश धर्माधिकारी यांचे अलिबागमध्ये उद्या व्याख्यान

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभर हिंदू संमेलन आयोजित होत आहेत. त्यानुसार अलिबागमध्ये गुरुवारी (दि. २१) हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे हिंदुत्व या विषयावर जाहीर व्याख्यान होणार आहे. भाग्यलक्ष्मी हॉल, चेंढरे अलिबाग येथे गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजता हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील बेरोजगारांसाठी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग आणि आद्य क्रांतीकारी वासुदेव बळवंत फडके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 मे 2026 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन नागोठणे येथील आद्य क्रांतीकारी वासुदेव बळवंत फडके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील विविध रिक्त पदे तसेच अ‍ॅप्रेंटिसशिपसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. एसएससी, एचएससी, आयटीआय, डिप्लोमा इंजिनिअर, पदवी इंजिनिअर तसेच इतर पदवीधर उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे.

उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन Employment Job Seeker (Find A Job) Job Seeker Login या पर्यायाद्वारे लॉगिन करून शैक्षणिक माहिती अद्ययावत करावी. त्यानंतर 'Pandit Dindayal Upadhyay Job Fair' या पर्यायातून आपला जिल्हा निवडून उपलब्ध पदांसाठी शैक्षणिक पात्रतेनुसार ऑनलाईन अर्ज करावा.

ऑनलाईन अर्ज प्रक्रियेदरम्यान काही अडचण आल्यास कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक 02141-222029 किंवा लिपिक टंकलेखक, महेश वखरे यांच्या 9421613757 या भ्रमध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'मिनी महाराष्ट्र केसरी'






























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com